SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज




# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

CCTV CAMERA
बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १७.०७.२०२६ | अंक नं. ०९२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ ९९९/-*
2014 पासून आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

ANYTHING FOR ANYTHING
LIMITED PERIOD OFFER
त्वरा करा ऑफर ३१ जुलै २०२६ पर्यंतच आहे.
20 TO 40% OFF ON MEGA EXCHANGE
(सोमवारी विश्रांती)
Franchise by DB VENTURES
OPP. GOLD'S TV CENTRE, SAVEDI ROAD, AHILYANAGAR - 3 PH. : 0241-2427001/02
SONY GIFTS PVT. LTD. One Stop Shop

## 'श्री संत भगवानबाबा मल्टिस्टेट'कडून ठेवीदारांची २ कोटी ४४ लाखांची फसवणूक

### चेअरमन, संचालकांसह ७ जणांवर गुन्हा दाखल

नगर - बुरूडगाव रोडवरील चाणक्य चौक येथील श्री संत भगवानबाबा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या शाखेत ठेवदारांनी ठेवलेली मुदत ठेव (फिक्स डिपॉझिट) व्याजासह परत न करता तब्बल २ कोटी ४४ लाख ४२ हजार ३७७ रुपयांची फसवणूक व अपहार केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मल्टिस्टेटचे चेअरमन, संचालक अशा ७ जणांवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


याबाबत सतीश रामचंद्र पटारे (वय ५४, रा. गुगळे कॉलनी, बुऱ्हाणनगर, ता. नगर) यांनी १६ जुलै रोजी फिर्याद दिली आहे. ३ एप्रिल २०२३ ते २३ जानेवारी २०२५ या कालावधीत फिर्यादी तसेच इतर ठेवीदारांनी श्री संत भगवानबाबा मल्टिस्टेटच्या (मुख्य कार्यालय - गुलाबनगर, बालमटाकळी, ता.शेवगाव) चाणक्य चौक (बुरुडगाव रोड) शाखेत लाखो रुपयांच्या ठेवी ठेवल्या होत्या. ठेवीची मुदत पूर्ण झाल्यानंतर ठेवीदारांनी मल्टिस्टेटकडे आपल्या रक्कमेची मागणी केली. मात्र, मल्टिस्टेटच्या व्यवस्थापनाने ही रक्कम व्याजासह परत न करता, ती स्वतःच्या फायद्यासाठी वापरून संस्थेची व ठेवीदारांची मोठी फसवणूक केली. फिर्यादी व इतर ठेवीदार यांची फसवणूक झालेली रक्कम तब्बल २ कोटी ४४ लाख ४२ हजार ३७७ रुपये एवढी आहे.

या फसवणूक प्रकरणी मल्टिस्टेटच्या चेअरमन मंदाकिनी रंगनाथ वैद्य, व्हा.चेअरमन मयुर रंगनाथ वैद्य (रा.बालमटाकळी, ता.शेवगाव), संचालक नितीन सोपानराव तुपे (रा. आगरकर मळा, अहिल्यानगर), संचालक शांतीनाथ नागनाथ साखरे, संचालक राम लक्ष्मण पोपळघट, संचालक किशोर अनिल सुरवसे, आणि संचालक/सीईओ जयशाली मयुर वैद्य (सर्व रा. बाळमटाकळी, ता. शेवगाव) यांच्या विरोधात कोतवाली पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२), ३१६ (५), ३१८ (४), ३(५) सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे या आर्थिक गैरव्यवहाराचा पुढील तपास करत आहेत.

## नगर - पुणे महामार्गावरील कामक्षा माता मंदिरात मोठी चोरी चांदीचा मुकुट, सोन्याचे दागिने लंपास, ४ चोरटे सीसीटीव्हीत कैद

नगर - नगर - पुणे महामार्गावर असलेल्या कामरगाव (ता. नगर) येथील ग्रामदैवत कामक्षा माता मंदिरात १७ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास अज्ञात ४ चोरट्यांनी मोठी चोरी केली आहे. चोरट्यांनी मंदिराच्या गाभाऱ्यात घुसून देवीचा चांदीचा मुकुट तसेच मूर्तीवरील सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत. चोरीची ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे.



कामरगाव (ता. नगर) येथील कामक्षा माता मंदिरात चोरी करताना सीसीटीव्हीत कैद झालेले चोरटे

कामरगाव गावात मध्यवस्तीत पुरातन आणि परिसरात प्रसिद्ध असलेले कामक्षा माता मंदिर आहे. १७ जुलै रोजी पहाटे ३.१० वाजण्याच्या सुमारास या मंदिराजवळ ४ चोरटे आले. त्यांनी तोंडला रुमाल बांधलेले होते, तर हातात हातमोजे घातलेले होते. या चोरट्यांनी मंदिराच्या लोखंडी ग्रीलच्या दरवाजाचे कुलूप तोडले. त्यापैकी २ जण दरवाजाजवळ उभे राहिले आणि दोघे जण आत मध्ये गेले. आत गेलेल्या चोरट्यांनी मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करत मूर्तीचा चांदीचा मुखवटा, २ पितळी मुकुट, मूर्तीवरील सुमारे सोन्याचे दागिने हिसकावत काही वेळातच सर्व मुद्देमाल घेवून तेथून पोबारा केला. अवघ्या ३ मिनिटांमध्ये हे चोरटे आले आणि चोरी करून निघून गेल्याचे सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसून येत आहे. चोरट्यांनी मंदिराशेजारील काही घरांना बाहेरून कड्या लावल्या होत्या. तसेच जाताना चोरट्यांनी गावात राहणारे स्टेट बँक अधिकारी सतीश सोनवणे व रज्जाक शेख यांच्या बंद घरात देखील उचका पाचक केल्याचे सांगण्यात आले.

चोरी करतानाची आणि चोरटे पळून जातानाची घटना मंदिराच्या आत आणि बाहेरील भागात लावलेल्या सीसीटीव्ही मध्ये कैद झाली आहे. पहाटे ग्रामस्थांना मंदिरात चोरी झाल्याचे समजले. त्यावेळी तेथे ग्रामस्थ मोठ्या संख्येने जमा झाले. याबाबत नगर तालुका पोलिसांना माहिती देण्यात आली. ही माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे, स.फौ. दत्तात्रय हिंगडे, पोलीस अंमलदार जगदीश जंबे, नितीन शिंदे, विक्रांत भालसिंग, चालक विकास शिंदे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी व पंचनामा केला.

चोरट्यांच्या तपासासाठी मंदिर व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहे. त्या आधारे पोलिसांनी तपास सुरु केला आहे. सीसीटीव्ही फुटेज मधील दिसणाऱ्या चोरट्यांच्या सारख्या हालचाली असलेला एक जण काही दिवसांपूर्वी या परिसरात फिरताना काही ग्रामस्थांना दिसला होता. त्याने अगोदर येवून रेकी केली आणि नंतर सफाईदारपणे ही चोरी केली असावी अशी शक्यता ग्रामस्थांनी सदर सीसीटीव्ही फुटेज पाहून व्यक्त केली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात मंदिर ट्रस्ट चे सचिव संदीप रामचंद्र गुंजाळ (वय ४५, रा. कामरगाव, ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गर्जेंद्र इंगळे हे करत आहेत.



चोरीला गेलेले, गहाळ झालेले मोबाईल हस्तगत करून मूळ मालकांना परत करताना पोलिस.

## 'चोरीला गेलेले ७० मोबाईल' शोधून मूळ मालकांना पोलिसांनी केले परत

नगर - पोलिसांनी नगर शहर व परिसरातून चोरीला गेलेले, गहाळ झालेले सुमारे १० ते १२ लाख रुपये किंमतीचे विविध प्रकारचे ७० मोबाईलचा शोध घेत ते मूळ मालकांना पुन्हा मिळवून दिले आहेत. शहरातील कोतवाली, तोफखाना, भिंगार कॅम्प या तीनही पोलीस ठाण्यांमधील प्रभारी अधिकारी आणि तांत्रिक पोलीस अंमलदारांनी विशेष मोहीम राबवत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत ही कामगिरी केली आहे.

शहर व परिसरात मोबाईल चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झालेली आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन व अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे तसेच पोलीस उपअधिक्षक डॉ.दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील कोतवाली, तोफखाना, भिंगार कॅम्प या तीनही पोलीस ठाण्यातील मोबाईल सेल चे काम पाहणाऱ्या पोलीस अंमलदारांनी विशेष मोहीम राबवत संचारसाठी पोर्टल सह विविध प्रकारचे आधुनिक तंत्रज्ञान वापरत चोरीला गेलेले व गहाळ झालेले सुमारे ७० मोबाईल हस्तगत केले आहेत.

हे मिळविलेले मोबाईल कोतवाली पोलीस ठाण्याच्या आवारात १७ जुलै रोजी पोलीस उपअधिक्षक डॉ.दिलीप टिपरसे यांच्या हस्ते मूळ मालकांना सुपूर्त करण्यात आले. यावेळी कोतवाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, भिंगार कॅम्प स.पो.नि.तेजस्वी थोरात , तोफखाना स.पो. नि.पुनम श्रीवास्तव यांच्या सह मोबाईल सेलचे काम पाहणारे कोतवालीचे पोलीस कॉन्स्टेबल महेश पवार, भिंगार कॅम्पचे पोलीस कॉन्स्टेबल संदीप थोरात, तोफखान्याचे पोलीस कॉन्स्टेबल सचिन बाचकर आदी उपस्थित होते.

हरविलेला, चोरीला गेलेला मोबाईल परत मिळाल्याने मूळ मालकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. त्या सर्वांनी पोलिसांच्या या कारवाई बद्दल आभार मानले.

यावेळी बोलताना पोलीस उपअधिक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी नागरिकांना आवाहन केले की, जर कोणाचाही मोबाईल हरवला, किंवा चोरीला गेला तर तात्काळ पोलीस स्टेशनला तक्रार देण्यात यावी तसेच संचारसाथी या पोर्टल वर आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत, त्यामुळे तुमचा मोबाईल लॉक होईल व त्याचा वापर चोरट्याला करता येणार नाही. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तो मोबाईल पुन्हा हस्तगत करता येईल. त्यामुळे नागरिकांनी जागरूकता दाखवावी असे ही ते म्हणाले.

## भाजपाच्या महिला नगरसेविकेची इन्स्टाग्रामवर बदनामी; गुन्हा दाखल

श्रीरामपूर - श्रीरामपूर नगर पालिकेतील भाजपाच्या एका महिला नगरसेविकेची सोशल मीडियाच्या माध्यमातून बदनामी केल्याचा प्रकार समोर आला आहे. अज्ञात व्यक्तीने इन्स्टाग्राम वर त्यांच्या विषयी बदनामीकारक फोटो आणि आक्षेपार्ह मजकूर पोस्ट करून तो व्हायरल करत त्यांची बदनामी केली आहे. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात विनयभंग व माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत महिला नगरसेविका यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, १६ जुलै रोजी संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास जेव्हा त्यांनी स्वतःच्या मोबाईलवर इन्स्टाग्राम चालू केले, तेव्हा 'shrirampur.-05' या इन्स्टाग्राम अकाऊंट धारकाने त्यांचे बदनामीकारक फोटो आणि आक्षेपार्ह मजकूर पोस्ट करून तो व्हायरल केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या प्रकारामुळे नातेवाईक, मित्रपरिवार आणि समाजात त्यांची मोठी बदनामी झाली असून, त्यांना मानसिक व सामाजिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी संशयित इन्स्टाग्राम धारकाविरुद्ध विनयभंग आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या (आयटी अ‍ॅक्ट) विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक विशाल खैरे करत आहेत.

CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे | महिलांसाठी पादत्राणे | मुलांसाठी पादत्राणे
क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स, स्नीकर्स,कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज, स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल, बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका! ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE शू पॅलेस
सारडागल्ली,अ.नगर, मो : 9881531536

हाईलाईटस् ऑफ
राजस्थानची शाही सफर
₹ 35,000* ६ दिवस
जयपूर • पुष्कर • चित्तोडगड • उदयपूर •
राजलक्ष्मी हॉलिडेज
प्रसाद श्रीकांत मांढरे
9112384842, 9850063432

बाळ आजारी आहे का?
ते वारंवार आजारी असणे | नेहमी सर्दी, खोकला
वारंवार होणारा बाल दमा | वारंवार जुलाब होणे
प्रतिकारशक्ती कमी असणे | वजन, उंची कमी
या तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
*सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
*सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
संपर्क : मो. ९५११११०४४४ डॉ.अनिरुद्ध गिते MBBS / MD paeds
अक्षय मुलांचे हॉस्पिटल बालिकाश्रम रोड, अ.नगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# कारागृहातील बंदीवानांसाठी 'सहाय्यक योग प्रशिक्षक' कौशल्य प्रशिक्षणास प्रारंभ

नगर – जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त जिल्हा कारागृहात जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि जन शिक्षण संस्था, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहाय्यक योग प्रशिक्षक' या कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या नवीन तुकडीस प्रारंभ करण्यात आला.

यावेळी सहाय्यक आयुक्त योगेश उगले, जिल्हा कारागृह अधीक्षक संतोष कवार, जन शिक्षण संस्थेचे संचालक अनिल तांदळे आणि कार्यक्रम अधिकारी शफाकत सय्यद उपस्थित होते.

सहाय्यक आयुक्त योगेश उगले यांनी बंदीवानांच्या पुनर्वसन व स्वावलंबनासाठी कौशल्याधारित प्रशिक्षण महत्त्वाचे असून अधिकाधिक बंदीवानांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कारागृह अधीक्षक संतोष कवार यांनी मागील तुकडीतील प्रशिक्षणामुळे बंदीवानांना झालेल्या फायद्यांची माहिती देत भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतील, असे सांगितले. शिक्षा पूर्ण झाल्यानंतर समाजाच्या मुख्य प्रवाहात परतल्यावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी कौशल्य आत्मसात करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शफाकत सय्यद यांनी केले. अनिल तांदळे यांनी आभार मानले.

## जुन्या वादातून मजुराला लोखंडी पाईपने मारहाण

नगर – शहरातील संजय नगर येथील काटवन खंडोबा रोड परिसरात जुन्या वादाचा राग मनात धरून एका ६२ वर्षीय वयोवृद्ध मजुराला लोखंडी पाईपने बेदम मारहाण केल्याची घटना १६ जुलै रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास घडली आहे.

गोपाल बाबु भुजिया (वय ६२) असे मारहाणीत जखमी झालेल्या वृद्धाचे नाव असून, त्यांनी याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, पूर्वी तक्रार दिल्याच्या रागातून संशयित आरोपी राजेश गुटीया याने फरसान कारखान्याजवळ गोपाल यांना अडवून लोखंडी पाईपने मारहाण करत जखमी केले, तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी पोलिसांनी संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देशमुख करत आहेत.

## झेंडीगेट परिसरात गोमांसाची विक्री; एकाला पकडले

नगर – शहरातील झेंडीगेट परिसरातील अशरफी मशिदीजवळील एका खोलीत गोमांस विक्री करण्याच्या उद्देशाने ठेवण्यात आलेल्या कोतवाली पोलिसांनी १६ जुलै रोजी दुपारी २ च्या सुमारास छापा टाकून पकडले आहे. त्याच्या ताब्यातून १० हजार ७०० रुपये किमतीचे ७० किलो गोमांस आणि कापण्यासाठी वापरलेला चाकू जप्त केला आहे.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल महेश सुभाष पवार यांच्या फिर्यादीवरून संशयित आरोपी शहाबुद्दीन अफजल शेख (वय २९, रा. घासगल्ली, कोठला) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पो.हे.कॉ.शिंदे करत आहेत.

# व्यवसाय परवाना शुल्कात १६०% वाढीचा प्रस्ताव पाहता शहरात सक्षम विरोधी पक्ष असणे किती आवश्यक आहे हे मतदारांनी समजून घ्यावे

### शुल्क वाढीला ठाकरे शिवसेनेचा विरोध, आक्रमक पवित्रा घेण्याचा किरण काळेंचा इशारा



नगर – अहिल्यानगर महापालिकेकडून व्यवसाय परवाना शुल्कात तब्बल १६० टक्के वाढ करण्याचा महासभेच्या मंजुरीसाठी प्रशासना कडून सादर करण्यात आलेला प्रस्ताव अत्यंत अन्यायकारक असून दुकानदार, छोटे किरकोळ विक्रेते, व्यापारी यांच्यावर आणि जनविरोधी आहे. या प्रस्तावाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा तीव्र जाहीर विरोध आहे. पाशवी बहुमता सह एकहाती सत्ता दिल्याचा हा दुष्परिणाम आहे. लोकशाहीमध्ये, नगर शहरात सक्षम विरोधी पक्ष असणे किती आवश्यक आहे, याचे हे जिवंत उदाहरण असल्याचे प्रतिपादन महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे.

शहरात सुमारे ५० हजार लहान–मोठी दुकाने व व्यावसायिक आस्थापना असून या प्रस्तावामुळे व्यापाऱ्यांवर मोठा आर्थिक बोजा पडणार आहे. काळे म्हणाले, ही तर केवळ सुरुवात आहे. पुढील पाच वर्षांत प्रत्येक घटकाला सत्ताधारी हे हुकुमशाही निर्णय लादून उध्वस्त करतील. राम मंदिरावर पडलेल्या दरोड्यावर मूग गिळून गप्प बसलेले तथाकथित ढोंगी हिंदुत्ववादी सगळ्यांना त्यांच्या राजकीय स्वार्थासाठी एकीकडे जय श्रीरामचा नारा द्यायला लावत आहेत, तर दुसरीकडे स्वकष्टाने व्यापार, स्वयंरोजगारातून पोट भरणाऱ्यांना आर्थिक संकटाच्या खाईत लोटत आहेत.

काळे पुढे म्हणाले, मतदारांनी सभागृहात चुकीच्या निर्णयांना विरोध करण्यासाठी विरोधी पक्षालाही पुरेसे प्रतिनिधित्व दिले असते, तर आज सत्ताधाऱ्यांना असे मनमानी निर्णय घेण्याचे धाडस झाले नसते. जेव्हा सत्ताधाऱ्यांना एकतर्फी प्रचंड बहुमत मिळते तेव्हा सत्तेचा माज वाढतो आणि समाजातील विविध घटकांचे आर्थिक शोषण सुरू होते. आज अहिल्यानगरमध्ये नेमके तेच चित्र दुर्दैवाने सर्वच घटकातील नागरिकांना पहावे लागत आहे.

गल्ली ते दिल्ली सत्ता असून देखील महापालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यात सत्ताधारी पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. स्वतःच्या चुकीच्या आर्थिक नियोजनाची, निष्क्रिय कारभाराची आणि अपव्ययाची किंमत आता शहरातील सुमारे ५० हजार व्यापाऱ्यांकडून वसूल करण्याचा हा अघोरी प्रताप सत्ताधाऱ्यांकडून केला जात असल्याचा आरोप किरण काळे यांनी केला आहे.

### तेव्हा २०२३ मध्ये आम्ही हा डाव हाणून पाडला होता

सन २०२३ मध्ये देखील हा प्रस्ताव महासभेकडून मंजूर करण्यात आला होता. त्यावेळी आम्ही महापालिकेसमोर दोन दिवसांचं धरण आंदोलन केलं. प्रस्ताव पायदळी तुडवत निदर्शन केली. वेगवेगळ्या व्यापारी संघटनांच्या भेटीगाठी घेऊन जनजागृती केली. आमच्यासह बहुतांशी संघटनांनी त्यावेळी या निर्णयाला विरोध केला होता. आम्ही जन आंदोलन उभं करत २०२३ मध्ये तो डाव हाणून पाडला होता. पण नुकत्याच झालेल्या मनपा निवडणुकीत ज्यांनी निवडून देत सत्ताधाऱ्यांना पाशवी बहुमत दिलं तेच आता पन्नास हजार व्यावसायिक, व्यापाऱ्यांच्या मुळावर उठले आहेत. आम्ही कालही या घटकांच्या साठी लढलो. उद्याही लढू. मात्र आपण चुकीच्या लोकांच्या हाती सत्तेच्या चाव्या दिल्या तर काय दुष्परिणाम होतात याचे आत्मपरीक्षण मतदारांनी देखील करण्याची गरज असल्याचे किरण काळे यांनी म्हटले आहे.

### ठराव मंजूर करणारे गद्दार सेनेत, गद्दार राष्ट्रवादीत

सन २०२३ च्या महासभेत जनविरोधी या ठरावाच्या बाजूने जे उभे राहिले, सूचक, अनुमोदक झाले, ते आज गद्दार सेनेत आणि गद्दार राष्ट्रवादीत आहेत. निवडणूक होईपर्यंत त्यांनी कळ काढली. पण आता आपल्या कार्यकर्ते ठेकेदारांना बिल देण्यासाठी आणि मनपा तिजोरीवर दरोडा घालण्यासाठी तिजोरीत दमडी शिल्लक नसल्यामुळे सत्तेच्या जोरावर पुन्हा हा घाट घातला आहे. येत्या महासभेत या निर्णयाला सत्ताधारी नगरसेवकांनी मंजुरी देऊ नये. अन्यथा ठाकरे शिवसेना आक्रमक पवित्रा घेईल, असा इशारा काळे यांनी दिला आहे.

## पंढरपूरला पायी दिंडीत चाललेल्या वारकऱ्याचे हृदयविकाराने निधन

### नगर - सोलापूर महामार्गावर रुईछत्तीसी गावाजवळील दुर्दैवी घटना

नगर – आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूर कडे पायी दिंडीत चाललेल्या राहुरी तालुक्यातील एका वृद्ध वारकऱ्याचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नगर सोलापूर महामार्गावर रुईछत्तीसी गावाजवळ १६ जुलै रोजी दुपारी घडली आहे. बबन परसराम कोठुळे (वय ८५, रा. मल्हारवाडी, ता. राहुरी) असे मृत वारकऱ्याचे नाव आहे.



बबन कोठुळे

मयत बबन कोठुळे हे राहुरी तालुक्यातील ताहाराबाद येथील महिपती महाराज यांच्या पायी दिंडीत सहभागी होत, पंढरपूर कडे जात होते. सदर दिंडी १६ जुलै रोजी दुपारी नगर – सोलापूर महामार्गाने रुईछत्तीसी गावाजवळ गेली असता, पायी चालताना बबन कोठुळे यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. त्यामुळे दिंडीतील काही वारकऱ्यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविले.

त्यांचा मुलगा गोरखनाथ कोठुळे यांनाही याबाबत कळविण्यात आले. तेही तातडीने जिल्हा रुग्णालयात आले. जिल्हा रुग्णालयातील मेडिकल ऑफिसर डॉ. चोपडे यांनी बबन कोठुळे यांची तपासणी केली असता उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून नगर तालुका पोलीस ठाण्यात याप्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मयत बबन कोठुळे यांच्यावर सायंकाळी उशिरा त्यांच्या गावी मल्हारवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# अमृत संस्थेच्या उद्योजकता विकास कार्यक्रम प्रशिक्षणास अहिल्यानगर येथे प्रारंभ

नगर – महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)च्या अहिल्यानगर जिल्हा कार्यालयात 'अमृत उद्योजकता विकास कार्यक्रम' प्रशिक्षणास उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. अमृत संस्थेचे विभागीय व्यवस्थापक प्रथमेश कुलकर्णी यांच्या हस्ते तसेच टी.जे.एस.बी. बँकेचे शाखाधिकारी राहुल पटवेकर आणि जनता सहकारी बँकेचे सहाय्यक शाखाधिकारी मिलिंद भणगे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षणाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अमृत मित्र वैभव कुलकर्णी, अमृत सखी गौरी कुलकर्णी तसेच सुजल झुंजारे उपस्थित होते.

प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी विभागीय व्यवस्थापक प्रथमेश कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात अमृत संस्थेच्या विविध योजनांची माहिती देत उद्योजकता विकासासाठी प्रशिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले.

टी.जे.एस.बी. बँकेचे शाखाधिकारी राहुल पटवेकर यांनी बँक कर्ज प्रस्ताव, आवश्यक कागदपत्रे, विविध प्रकारची कर्जे, कर्ज मंजुरी प्रक्रिया तसेच बँकिंग व्यवहारांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

जनता सहकारी बँकेचे सहाय्यक शाखाधिकारी मिलिंद भणगे यांनीही लाभार्थ्यांना बँकिंग क्षेत्राशी संबंधित महत्त्वपूर्ण माहिती दिली. प्रशिक्षणादरम्यान लाभार्थ्यांनी बँकिंग आणि कर्ज प्रक्रियेशी संबंधित विविध प्रश्न उपस्थित केले. मान्यवरांनी त्यांच्या शंकांचे समाधानकारक निरसन केले. त्यामुळे सहभागी लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.

प्रशिक्षणाच्या समारोपावेळी जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

प्रशिक्षणात एकूण १५ लाभार्थ्यांनी सहभाग नोंदविला. अमृत ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असून, शासनाच्या इतर महामंडळांचा लाभ न मिळणाऱ्या खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांसाठी विविध स्वयंरोजगार, उद्योजकता व आर्थिक सक्षमीकरणाच्या योजना राबविते. वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या पात्र व्यक्तींना संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेता येतो.

राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत अमृतची कार्यालये कार्यरत असून, अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी https://mahaamrut.org.in या संकेतस्थळास भेट द्यावी अथवा ९११२२२८७६९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## पोखर्डी येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

नगर – नेवासा तालुक्यातील पानेगाव येथील रहिवासी असलेल्या एका ३३ वर्षीय तरुणाने पोखर्डी येथे गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना १६ जुलै रोजी सायंकाळी घडली आहे. भिमराज भाऊसाहेब गायकवाड असे मृत तरुणाचे नाव आहे.

भिमराज यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्यावर त्यांना आकाश कचरु डुकरे (रा. चांदा, ता. नेवासा) यांनी तात्काळ उपचारासाठी नगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, रुग्णालयातील मेडिकल ऑफिसर डॉ. शिंदे यांनी त्यांना तपासून उपचारापूर्वीच मृत घोषित केले.

याबाबतच्या अहवालावरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# २ महिने उलटले तरीही विद्यार्थी पाठ्यपुस्तकांपासून वंचित; प्रभारी व्यवस्थेमुळे व्यवस्था ढासळली? 'शिक्षका'चा आरोप

नगर – शैक्षणिक वर्ष सुरू होऊन जवळपास दोन महिने उलटले तरी अनेक जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना शासनाची मोफत पाठ्यपुस्तके मिळालेली नसल्याचा आरोप शिक्षक भारती संघटनेने केला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्काशी संबंधित या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करावी, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

शिक्षक भारतीचे पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी शिक्षणमंत्री, अपर मुख्य सचिव, शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक आणि जिल्हा परिषद अहिल्यानगरचे शिक्षणाधिकारी यांना सविस्तर निवेदन पाठवून अकोले तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेतील गंभीर त्रुटी निदर्शनास आणून दिल्या आहेत. संघटनेच्या म्हणण्यानुसार, शासनाचे स्पष्ट धोरण असूनही विद्यार्थ्यांना वेळेत पाठ्यपुस्तके न मिळाल्याने त्यांच्या शिक्षणाचे मोठे नुकसान होत आहे.

संघटनेने पंचायत समिती अकोले येथील शिक्षण विस्तार अधिकारी तथा प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांच्या कार्यपद्धतीबाबतही आक्षेप नोंदवले आहेत. पाठ्यपुस्तक वितरणाबाबत वारंवार विचारणा करूनही समाधानकारक प्रतिसाद मिळाला नसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. तसेच शिक्षक, पालक आणि संघटनांकडून संबंधित अधिकाऱ्यांच्या उद्धट वर्तनाबाबत विविध तक्रारी प्राप्त झाल्याचेही संघटनेने नमूद केले आहे.

### 'प्रभारी' व्यवस्थेमुळे प्रशासन ठप्प?

अकोले तालुक्याला गेल्या अनेक वर्षांपासून नियमित पूर्णवेळ गटशिक्षणाधिकारीच मिळालेला नाही. प्रभारी व्यवस्थेवरच संपूर्ण कारभार चालत असल्याने शैक्षणिक नियोजन, पाठ्यपुस्तक वितरण, शिक्षकांच्या सेवा विषयक प्रश्नांचे निराकरण आणि शासनाच्या योजनांची अंमलबजावणी यावर परिणाम होत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. संघटनेने शासनाला मागणी केली आहे की, अकोले तालुक्यास तात्काळ कायमस्वरूपी पूर्णवेळ गटशिक्षणाधिकारी नियुक्त करावा. सक्षम अधिकारी उपलब्ध झाल्यास अशा प्रकारच्या समस्या भविष्यात टाळता येतील आणि प्रशासन अधिक जबाबदार होईल, असे संघटनेचे मत आहे.

### उच्चस्तरीय चौकशीची मागणी

निवेदनात पाठ्यपुस्तक वितरणातील विलंबाची विभागीय चौकशी, संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची स्वतंत्र चौकशी, जबाबदारी निश्चित करणे, तसेच लागू नियमांनुसार आवश्यक प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. संघटनेने या निवेदनावर तातडीने कार्यवाही न झाल्यास पुढील लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. या मागणीससचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, महिला अध्यक्ष रुपालीताई बोरुडे, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, दीपक फापाळे, समन्वयक शरद पवार, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, प्रवीण मालुंजकर, साई थोरात, संपत वाळके, प्रवीण काळे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, अतुल कोताडे, दिगंबर देसाई, महेंद्र काळणे, सचिव वंदना जाधव, कल्पना चौधरी, मफीज इनामदार, गणपत धुमाळ, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, श्याम जगताप, आदी पदाधिकारी यांनी पाठिंबा दिला आहे.

# बंद स्ट्रीट लाईट तातडीने सुरू कराव्यात; अन्यथा ठिय्या आंदोलन करणार

निंबळक – नगर तालुक्यातील निंबळक गावातील मुख्य रस्ते व अंतर्गत भागातील अनेक स्ट्रीट लाईट गेल्या अनेक दिवसांपासून बंद असल्याने नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर स्वराज्य प्रतिष्ठान, निंबळक यांच्या वतीने प्रशासक तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत निंबळक यांना निवेदन देऊन तातडीने बंद स्ट्रीट लाईट दुरुस्त करून सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात दत्त मंदिर चौक ते एमआयडीसी बायपास चौक रस्ता, दत्त मंदिर चौक ते निमगाव रोड, दत्त मंदिर ते इसळक–खारेकर्जुने रोड तसेच इतर प्रमुख मार्गांवरील स्ट्रीट लाईट बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य पसरत असून महिला, विद्यार्थी, कामगार वर्ग, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच चोरी, अपघात व इतर अनुचित घटनांची शक्यता वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश म्हस्के यांनी पुढील २ ते ३ दिवसांत बंद स्ट्रीट लाईटची दुरुस्ती करून त्या सुरू कराव्यात, अन्यथा नागरिकांसह संबंधित कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाला दिला आहे.

या निवेदनावर महेश म्हस्के, बी.डी.कोतकर, सोमनाथ खांदवे, प्रदीप कोतकर, चेतन काळे यांच्यासह पदाधिकारी व सदस्यांच्या सह्या आहेत.


## चंद्रकलाबाई मुथ्था यांचे संथाराव्रतात निधन



नगर – झेडपी कॉलनी, आगरकर मळा, जैन स्थानका जवळील रहिवासी सौ. चंद्रकलाबाई मुथ्था (वय ७२) यांचे १७ जुलै रोजी संथारा व्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १७ जुलै रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. परितोष, गिरीश मुथ्था व पायल संचेती यांच्या त्या मातोश्री तर अशोक मुथ्था यांच्या पत्नी होत.

## विठ्ठल कोमलवार यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – छत्रपती संभाजीनगर येथील विठ्ठल महादू कोमलवार (वय ६७) यांचे १६ जुलै रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर एन ११ सौभाग्य चौक स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ४ मुले, ४ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अशोक कोमलवार यांचे ते वडील होत.

## श्रीमती सुमनबाई मंचेवार यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – लक्ष्मीनारायणपूर (जालना) येथील रहिवासी श्रीमती सुमनबाई गिरमाजी मंचेवार (वय ८०) यांचे १७ जुलै रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जालना अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ४ मुले, सुना, २ मुली, नातवंडे, जावई असा परिवार आहे. सागर, दयानंद व मंगेश यांच्या त्या मातोश्री होत.

# नरेंद्र फिरोदिया चषक बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ

### देशातून ३८० पेक्षा जास्त खेळाडूंचा सहभाग, ५ ते ८३ वर्षांच्या खेळाडूंची बुद्धीची कसोटी

नगर – अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिक आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ उत्साहात झाला. लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे सुरू झालेल्या या तीन दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य कृष्णा भंडलकर यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर प्रतीकात्मक चाल देऊन करण्यात आले.

यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी, सचिव यशवंत बापट, अमोल घोलप, डॉ. अमोल तांबे, सुबोध ठोंबरे, पारुनाथ ढोकळे, शाम कांबळे, अनुराधा बापट, प्रकाश गुजराथी, रोहिणी आडकर, शुभदा ठोंबरे, संजय खडके, स्वप्निल भमूरकर, नवनीत कोठारी, मनीष जसवानी, सनी गुगळे, चेतन कड, अतुल कोठारी, पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, दीपक वच्छाण, विजय ढाले, डी. बी. चौरे, शार्दुल टापसे, देवेंद्र ढोकळे, शिरीष इंदलकर, प्रशांत धमेकर यांच्यासह खेळाडू व पालक उपस्थित होते.



अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिक आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ उत्साहात झाला.

प्रास्ताविकात सचिव यशवंत बापट यांनी संघटनेच्या कार्याची माहिती देताना सांगितले की, या स्पर्धेसाठी आंध्र प्रदेश, गोवा, गुजरात, हरियाणा, झारखंड, कर्नाटक, मध्य प्रदेश, तेलंगणा, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बिहार, जम्मू–काश्मीर तसेच महाराष्ट्र राज्यातून ३८० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून बुद्धिबळ क्षेत्रातील नरेंद्र फिरोदिया यांच्या योगदानाला अभिवादन म्हणून त्यांच्या नावाने सलग तिसऱ्यांदा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धेत अवघ्या पाच वर्षांच्या बालकांपासून ते ८३ वर्षांच्या ज्येष्ठ खेळाडूंपर्यंत विविध वयोगटातील बुद्धिबळपटू सहभागी झाले असून, आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर यशाची उत्तुंग भरारी घेण्यासाठी ते सज्ज झाले आहेत.

तसेच कृष्णा भंडलकर यांनी आपल्या मनोगतात अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे कौतुक करत सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संघटनेचे खजिनदार सुबोध ठोंबरे यांनी केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### राखा मानसिक स्वास्थ्य

आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धात्मक युगात मानसिक ताणतणावामुळे उदासीनता आणि नैराश्य येणे सामान्य झाले आहे, पण योग्य जीवनशैली आणि सकारात्मक सवयींच्या मदतीने आपण या समस्येपासून स्वतःचा यशस्वीरीत्या बचाव करू शकतो. मानसिक आरोग्य जपण्यासाठी सर्वात महत्त्वाचे म्हणजे रोज सकाळी किमान २० ते ३० मिनिटे वेगाने चालणे, व्यायाम किंवा योगासने करणे आवश्यक आहे, कारण यामुळे शरीरात आनंदी हार्मोन्स तयार होऊन मूड सुधारतो. यासोबतच मनातल्या भावना कधीही दाबून न ठेवता आपल्या जवळच्या मित्रांशी किंवा कुटुंबाशी बोलून मन मोकळे केल्याने डोक्यावरील मानसिक दडपण खूप कमी होते. आपल्या रोजच्या आहारात पालेभाज्या, फळे आणि सुकामेव्याचा समावेश करावा आणि रात्री उशिरापर्यंत मोबाईल किंवा सोशल मीडियाचा वापर पूर्णपणे टाळून ७ ते ८ तासांची शांत झोप घ्यावी, कारण अपुरी झोप नैराश्याला थेट निमंत्रण देते. सतत नकारात्मक विचार करणाऱ्या लोकांपासून दूर राहून स्वतःला चित्रकला, वाचन, संगीत किंवा बागकामासारख्या आवडीच्या छंदांमध्ये गुंतवून ठेवल्यास मेंदूला सकारात्मक ऊर्जा मिळते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही गोष्टीचा अतिविचार करणे थांबवून वर्तमानात जगण्याचा प्रयत्न करावा आणि जर उदासीनता खूप दिवस टिकून राहत असेल, तर कोणताही संकोच न बाळगता मानसोपचारतज्ज्ञांचा किंवा समुपदेशकाचा सल्ला घ्यावा कारण वेळीच घेतलेली मदत आयुष्य बदलू शकते.

## पाककला

### दुधी हलवा

**साहित्य** : खवलेली दुधी ४ कप, फुल फॅट दूध ३ कप, साखर १ कप, तूप ४ चमचे, वेलची पूड १/२ चमचा, जायफळ पूड १ चिमूट, काजू १०-१२, बदाम ८-१०, मनुका १२-१५, केशर ८-१० काड्या

**कृती** : उकडलेली दुधी पिळून पाणी काढून घ्या. २ चमचे गरम दुधात केशर भिजत ठेवा. कढईत २ चमचे तूप गरम करून त्यात काजू, बदाम आणि मनुका तळून बाजूला काढा. त्याच कढईत उरलेले तूप घालून त्यात खवलेली दुधी घाला. मंद आचेवर ५-७ मिनिटे दुधीचा कच्चेपणा जाईपर्यंत परता. आता त्यात दूध घालून दुधी पूर्ण मऊ आणि दूध आटेपर्यंत शिजवा. मधून मधून ढवळत रहा जेणेकरून तळाला लागणार नाही. दूध आटल्यावर त्यात साखर घाला. साखरेचे पाणी सुटून परत घट्ट होईल. त्यात वेलची पूड, जायफळ पूड आणि भिजवलेले केशर घाला. शेवटी तळलेले ड्रायफ्रूट्स घालून २ मिनिटे परता. गरमागरम किंवा थंड दुधी हलवा सर्व्ह करा. जास्त दाट हवा असेल तर शेवटी २ चमचे मिल्क पावडर घालू शकता.

## वास्तू

### सकारात्मकतेसाठी

✻ सकाळी घरात कापूर जाळा आणि सगळ्या खोल्यांमध्ये धूर फिरवा. निगेटिव्हिटी जाते.

✻ मुख्य दरवाज्यावर स्वस्तिक आणि पायपुस स्वच्छ ठेवा. पहिली एनर्जी तिथूनच येते.

✻ आरसा बेडच्या समोर लावू नका. झोपेत अस्वस्थता येते.

✻ तुळस घराच्या मध्यभागी किंवा पूर्वेला ठेवा. पण वाळलेली पानं लगेच काढा.

✻ घरात काटेरी झाडे लावू नका फक्त गुलाब चालतो. काटे वाद वाढवतात.

## सौंदर्य

लिंबू पिळून झाल्यावर साल फेकू नका. त्यावर थोडी साखर घेऊन कोपरे, गुडघे आणि मानेच्या काळ्या भागावर २ मिनिटे घासा. लिंबातील सायट्रिक ॲसिड नैसर्गिक ब्लीच आहे. नंतर मॉइश्चरायझर लावा.

## सल्ला

मलाई नसेल तर १ उकडलेला बटाटा किंवा ६-७ भिजवलेले काजू वाटून ग्रेव्हीला घाला. चवही छान येते आणि क्रिमीसारखी टेक्सचर मिळते. पनीर भाजीला बेस्ट आहे. ग्रेव्ही घट्ट करायला बटाटा/काजू पेस्ट सर्वोत्तम उपय आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. १८ जुलै २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, पूर्वा १८।००, सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. ०८ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आज घरात आनंदाचे वातावरण राहील.

**वृषभ** : आज आर्थिक स्थिती चांगली राहील.

**मिथुन** : आज तुम्हाला महत्त्वाची बातमी समजेल.

**कर्क** : आज फिरणे आणि मजा करण्याचा योग आहे.

**सिंह** : आज जोडीदारासोबत संबंध सुधारतील.

**कन्या** : आज नोकरीत समाधान मिळेल.

**तूळ** : आज करिअरमध्ये नवीन संधी मिळेल.

**वृश्चिक** : आज हाती घेतलेले काम पूर्ण होईल.

**धनु** : आज मन थोडे अस्थिर राहील.

**मकर** : आज दिवसाची सुरुवात शुभ असेल.

**कुंभ** : आज खर्च जास्त होऊ शकतो.

**मीन** : आज समाजात तुमचा मान वाढेल.

## शब्दगंध क्र. ७४७५ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ |
| ७ | | | ■ | ८ | | ९ | |
| १० | | ■ | ११ | | ■ | | ■ |
| १२ | | १३ | | ■ | १४ | | १५ |
| ■ | ■ | १६ | | १७ | ■ | ■ | |
| १८ | | | ■ | १९ | | २० | |
| | ■ | २१ | | | ■ | | ■ |
| २२ | | | ■ | २३ | | | |

**आडवे शब्द :-** १) मनसब धारण करणारा ७) चार पंचे एकत्र जोडलेले कापड, पाणी धरणारी जमीन ८) कणखर; मजबूत; काटक १०) नंतर; पुन्हा ११) फेकून मारण्याचे एक हत्यार १२) पाव भाग; एक चतुर्थांश; पंचवीस टक्के १४) ज्यात दाणे भरतात तो पिकाचा भाग; भुट्टा १६) अधर्म; पाप १८) सराव; अभ्यास १९) जमीन नांगरणे, पेरणे आदी शेतीच्या उपयोगाची कामे २१) माजलेला; उन्मत्त २२) भास्कर; रवि; सूर्य; दिनकर २३) आठवड्यातील सुट्टीचा दिवस

**उभे शब्द :-** १) खाताना होणारा तोंडाचा आवाज २) नव्याने आलेला ३) तलवारीचे म्यान किंवा तिला अडकविणारी दोरी ४) नवरा; पती; स्वामी; मालक ५) लढाई; युद्ध; समर; वाळूचे मैदान ६) स्तुतिपाठक; भाट ९) गोष्ट; स्टोरी; कथा ११) आपला देश; इंडिया १३) रागावलेला; कोपलेला १५) फुरसत; उसंत १७) कला जाणणारा; आर्टिस्ट १८) एकाच नवऱ्याची दुसरी बायको २०) रतीब; उकाडा

### शब्दगंध क्र. ७४७४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | म | शे | र | ■ | वा | स | रू |
| र | ■ | र | म | ता | रा | म | ■ |
| ब | र | वा | ■ | स | ण | ■ | जा |
| त | प | नी | य | ■ | शी | त | ल |
| ■ | का | ■ | मु | का | ■ | ■ | ना |
| का | ■ | ना | ना | सा | हे | ब | ■ |
| स | मा | न | ■ | र | ■ | ही | न |
| व | र | क | | ■ | फ | ण | स |

### फिल्मीचक्कर क्र. १२४५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| न | वी | न | नि | श्च | ल | ■ | द्वा |
| दी | ■ | य | ■ | ■ | ■ | आ | ग |
| म | द | न | पु | री | ■ | ज | ■ |
| श्र | ■ | ■ | ■ | ■ | फ | की | रा |
| व | न | मा | ला | ■ | ■ | मु | ■ |
| ण | ■ | या | ■ | ध | ■ | ला | या |
| ■ | ■ | पु | का | र | ■ | क | ■ |
| मा | धु | री | ■ | म | ■ | त | न |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : यशस्वी होण्यासाठी तुमची यशस्वी होण्याची इच्छा, अपयशी होण्याच्या भीतीपेक्षा खूप जास्त असली पाहिजे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### टीव्हीचा रिमोट काम करताना किरण दिसत नाहीत, मग टीव्हीला कसा कळतो?

एकविसाव्या शतकात रिमोट हे आपल्या घरातील सर्वात महत्वाचे साधन बनले आहे. सोफ्यावरून उठल्याशिवाय टीव्ही चालू-बंद करणे, चॅनल बदलणे, आवाज वाढवणे हे सगळे एका बटणाने होते. पण कधी विचार केला आहे का, रिमोटमधून काही निघताना दिसत नाही, तरी टीव्हीला ते कसे समजते?सर्वात महत्वाचे कारण म्हणजे अदृश्य प्रकाश. रिमोटमध्ये एक छोटा डएऊ दिवा असतो. पण तो आपल्याला दिसणाऱ्या पांढऱ्या किंवा पिवळ्या प्रकाशाचा नसतो. तो इन्फ्रारेड किरण सोडतो. याला थोडक्यात खठ किरण म्हणतात. हा प्रकाश आपल्या डोळ्यांना दिसत नाही, पण टीव्हीचा सेन्सर त्याला सहज पकडतो. रात्री कॅमेऱ्यातून रिमोटचे बटण दाबले तर हा हलका जांभळा प्रकाश दिसूही शकतो.दुसरे कारण म्हणजे कोडची भाषा. रिमोटमधून फक्त प्रकाश पडत नाही, तर तो प्रकाश एका सेकंदात हजारो वेळा लुकलुकतो. जछ, जत्र्क्र, तेर्श्रीश+, उहरपपशश्र ९ या प्रत्येक बटणासाठी वेगळा लुकलुकण्याचा कोड ठरलेला असतो. जसे आपण मोर्स कोड वापरतो तसेच. टीव्हीच्या समोर असलेला काळा सेन्सर हा कोड वाचतो आणि मग टीव्हीला सांगतो की व्हॉल्यूम वाढव किंवा चॅनल बदला.तिसरे कारण म्हणजे सरळ रेषा आणि अडथळा. हे खठ किरण रेडिओ लहरींसारखे भिंतीच्या पलीकडे जात नाहीत. त्यांना सरळ रेषेत टीव्हीच्या सेन्सरवर पडावे लागते. म्हणूनच रिमोट टीव्हीच्या दिशेने धरावा लागतो. मध्ये हात, पुस्तक किंवा कोणतीही वस्तू आली तर सिग्नल अडतो आणि टीव्ही काम करत नाही.चौथे कारण म्हणजे सेन्सरची खासियत. टीव्हीवर जो छोटा काळा किंवा लाल काच असतो तो सामान्य काच नसतो. तो फक्त इन्फ्रारेड किरणांनाच आत जाऊ देतो. खोलीतील इतर दिव्यांचा प्रकाश त्याला त्रास देत नाही. त्यामुळे दिवस असो की रात्र, रिमोट बरोबर काम करतो.थोडक्यात, रिमोटमधून किरण निघतात पण ते आपल्याला दिसत नाहीत. ते एका खास अदृश्य भाषेत टीव्हीशी बोलतात. हा प्रकाश, हा कोड आणि हा सेन्सर या तिघांच्या एकत्र कामामुळेच बटण दाबताच टीव्ही लगेच उत्तर देतो. म्हणूनच पुढच्या वेळी रिमोट हातात घ्या आणि विचार करा - आपण जे दाबतोय ते फक्त बटण नाही, तर अदृश्य प्रकाशाचा एक गुप्त संदेश आहे!

### खरी मैत्री

दोन शेतकरी आणि खऱ्या मैत्रीचे गुपित एका छोट्या गावात राम आणि श्याम नावाचे दोन शेतकरी राहत होते. दोघांची शेतं एकमेकांना लागून होती. दोघेही खूप गरीब होते, पण त्यांची मैत्री मात्र खूप श्रीमंत होती. वर्षभर दोघे एकमेकांच्या शेतात राबायचे आणि जे काही धान्य पिकायचे, ते दोघे अर्धे-अर्धे वाटून घ्यायचे.

एक वर्ष शेतात खूप छान भाताचे पीक आले. नेहमीप्रमाणे त्यांनी धान्याची पोती समसमान वाटून घेतली आणि आपापल्या गोदामात ठेवून दिली. त्या रात्री रामला झोप येत नव्हती. तो मनात विचार करू लागला, श्यामचे नुकतेच लग्न झाले आहे, त्याच्यावर आता नवीन संसाराची जबाबदारी आहे. भविष्यात त्याला माझ्यापेक्षा जास्त पैशांची आणि धान्याची गरज भासेल. पण तो स्वाभिमानी आहे, मी त्याला विनाकारण धान्य दिले तर तो घेणार नाही. हा विचार करून राम रात्रीच्या अंधारात उठला. त्याने आपल्या गोदामातून भाताचे एक मोठे पोते उचलले, गुपचूप श्यामच्या गोदामात नेऊन ठेवले आणि तो शांतपणे येऊन झोपला.

दुसरीकडे, त्याच रात्री श्यामलाही झोप येत नव्हती. त्याच्या मनात वेगळाच विचार चालला होता, माझे काय, मी एकटा जीव आहे, कसेही दिवस काढेन. पण रामचे वय झाले आहे, त्याचे कुटुंब मोठे आहे. त्याला भविष्यासाठी जास्त धान्याची गरज आहे. मला मिळालेला अर्धा वाटा माझ्या गरजेपेक्षा जास्तच आहे.

असा विचार करून श्यामही रात्री उठला. त्याने आपल्या गोदामातून एक धान्याचे पोते काढले आणि ते गुपचूप रामच्या गोदामात नेऊन ठेवले.

दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा दोघांनी आपापली पोती मोजली, तेव्हा दोघेही आश्चर्यचकित झाले! दोघांकडची पोती कमी न होता तितकीच होती. दोघांनाही याचे कारण समजले नाही.

दुसऱ्या रात्रीही दोघांनी तोच प्रकार केला. रामने श्यामच्या गोदामात पोते ठेवले आणि श्यामने रामच्या गोदामात. तिसऱ्या दिवशीही धान्याची संख्या बदलली नव्हती. तिसऱ्या रात्री मात्र रहस्य शोधण्यासाठी दोघेही एकाच वेळी पोते खांद्यावर घेऊन निघाले. अंधारात एकमेकांकडे जात असताना, रस्त्याच्या मधोमध दोघे एकमेकांसमोर आले. खांद्यावर धान्याचे पोते आणि डोळ्यात एकमेकांबद्दलचे प्रेम पाहून दोघांनाही एका क्षणात सगळा प्रकार समजला.

दोघांनीही हातातील पोती खाली ठेवली आणि ते एकमेकांना घट्ट बिलगले. त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. त्या रात्री धान्याचे वजन वाढले नव्हते, तर त्यांच्या खऱ्या मैत्रीचे मोल वाढले होते.

तात्पर्य : खऱ्या मैत्रीत 'मी' किंवा 'माझा स्वार्थ' नसतो, तर समोरच्याचा विचार आधी असतो. जिथे एकमेकांना देण्याची आणि सांभाळून घेण्याची भावना असते, तिथेच खरी मैत्री टिकते आणि समृद्ध होते.

## आत्मशक्ति



### मेरे प्रियतम्

मिलनाने आत्मा आनंदविभोर होऊन जातो, त्याच्या रोमरोमांत अतिउत्तम धुंदी चढते.

आमचा आत्मा ज्या प्रेमाचा अनुभव घेतो, ते इतके तीव्र असते की, त्यामुळे आम्ही अगदी वेडे होऊन जातो. आमचा आत्मा, परमेश्वराशी एकरूप होण्यासाठी सतत धडपडू लागतो. त्याचा विरह इतका असह्य होतो की, जणू काय कोणी आमच्या हृदयाचे तुकडे तुकडे केले आहेत.

अध्यात्मिक कवि, संत दर्शनसिंहजी महाराजांनी आत्मा-परमात्मा प्रेमाच्या संबंधात हजारो 'शेर' लिहिले आहेत, त्यापैकी एक आहे,

मेरा कोई दोस्त नहीं है, मेरे प्रियतम के सिवाय ।

मुझे कोई काम नहीं है, उसके प्रेम के सिवाय ।

(माझ्या प्रियतमाखेरीज मला दुसरा कोणी मित्र नाही आणि त्याचे गुणगाण गाण्याव्यतिरीक्त मला दुसरे काम नाही.)

जसे एखादा प्रेमी आपल्या प्रियतमाचाच दिवसरात्र विचार करीत राहतो, तसे एकदा आमचा आत्मा परमेश्वराशी एकरुप झाला की त्याच्या प्रेमाने पूर्णतः भरला जातो व तेव्हा त्याचीही अशीच स्थिती होते. अंतरी असलेल्या परमेश्वराच्या सुखासंबंधी संत दर्शनसिंहजी महाराज म्हणतात, खाक से तबाह कहकशाँ हमने तो जब किया सफर इश्क मिला कदम कदम, हुस्न मिला नजर नजर ।।

(आम्ही जेव्हा देहबुद्धीच्या वर येतो व अध्यात्म मंडळांच्या प्रवासास निघतो, तेव्हा आम्हाला परमेश्वराचे प्रेम पावलोपावली मिळते व जागोजागी त्याचे सौंदर्य नजरेस पडते.)

जेव्हा आम्ही प्रेम करतो तेव्हा जग (बाह्य परीसर) व आमचे जीवन सौंदर्याने उजळते. प्रत्येक गोष्ट आम्हाला सहज स्पष्ट व समृध्द होत गेलेली दिसते. प्रियकराच्या संगतीने आमचे सारे जीवनच बदलते, ते सुंदर होत जाते. संत दर्शनसिंहजी महाराज म्हणतात -

खिजाँ नसीब रास्ते भी सज गए सँवर गए ।
उन्हे बहार ही मिली, जहाँ गए, जिधर गए ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### मनातील स्पंदन

थंडीपासून माझं रक्षण करणारी रजई आणि माझा फोन ज्यावरून मी डॉक्टराना कॉल केला या सगळ्या निर्जीव वस्तू आहेत, पण यांनी मला वाचवलं. आपण सतत सजीव आणि निर्जीव असा फरक करत राहतो पण त्या दिवसानंतर दररोज सकाळी उठल्यावर मी या सगळ्या वस्तूंचे आभार मानतो. उदाहरणार्थ, माझी उशी, माझी रजई जे मला आराम देतात.त्यांची मी व्यवस्थित घडी घालतो आणि एका बाजूला ठेवून देतो. जेव्हा मी हॉटेल सोडतो तेव्हा मी त्या खोलीच्या भिंतींचे, पंख्यांचे आणि एसीचे आभार मानतो. असं करणं इतरांना कदाचित वेडेपणाचं वाटू शकतं. शिवानीदीदी : आपण निसर्गाचेही आभार मानायला हवेत.

सुरेश ओबेरॉय : आपण सूर्याचेही आभार मानायला हवेत. त्याने आपल्याला खूप काही दिलं आहे.

शिवानीदीदी : हे सगळं करताना कसं वाटतं ?

सुरेश ओबेरॉय : मला खूप छान वाटतं.

शिवानीदीदी : हाच कृतज्ञतेचा भाव आहे. जेव्हा आपण देव, मनुष्य, निसर्ग आणि निर्जीव वस्तू या सगळ्यांचे आभार मानतो तेव्हा कृतज्ञतेचा संस्कार तयार होतो. आता आतमध्ये जी ऊर्जा निर्माण झाली आहे त्याकडे लक्ष द्या. आपल्या मनातील स्पंदनं खूप शक्तिशाली असतात. आपल्या मनाची स्थिती, आपलं शरीर, माणसं, भोवताल आणि निसर्ग या सर्वांवर ते परिणाम करतात.

सुरेश ओबेरॉय : निसर्गाने आणि निर्जीव वस्तूंनी नेहमीच माझं रक्षण केलं आहे. एका अपघातात माझ्या गाडीतल्या काही जणांचा मृत्यू झाला, काहींना दुखापत झाली पण मला साधं खरचटलंही नाही. याचं कारण मी नेहमी माझ्या गाडीचे आभार मानायचो, तिला प्रेमाने वापरायचो आणि तिची काळजी घ्यायचो.

शिवानीदीदी : निसर्ग आणि निर्जीव वस्तू दोघांबरोबरही आपण नातं विकसित करतो. जर आपण वस्तू इतस्ततः फकत असू आणि वाया घालवत असू तर आपण त्यांच्या बरोबर चांगलं नात तयार नाही करत आहोत. आपल्या भोवतालच्या वस्तूंना आपण जसं वापरतो त्यानुसार आपल्याला परताव्यात काय मिळणार हे ठरतं.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पेशंट : डॉक्टर, दात काढायची फी किती?

डॉक्टर : ५०० रुपये.

पेशंट : बाप रे! दोन मिनिटांच्या कामाचे ५०० रुपये?

डॉक्टर : ठीक आहे, तुमच्या समाधानासाठी मी अर्धा तास लावून हळूहळू काढतो!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ २०२६ च्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेचे यजमानपद कोणत्या देशांकडे आहे? - भारत आणि श्रीलंका

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### लहसूण

कुष्ठरोग, मूत्रमार्गाचे विकार, पोटदुखी, कानदुखी यावरही वेदनाशामक म्हणून वापर करता येतो. उपयोग : १) लसूण दीपक, पाचक असल्याने तो खाल्ल्यास रक्तातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी होते. त्यामुळे रसरक्तवाहिन्यांमधून रक्ताचा पुरवठा सुरळीत होतो. पर्यायाने हृदयविकाराचा धोका टळला जातो. हृदयविकाराचा झटका येऊन गेल्यानंतरही जर रुग्णाने लसूण खाणे सुरू केले, तर रक्तातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी होऊन पुन्हा हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमाण कमी होते. खरेतर नंतर काळजी घेण्यापेक्षा सुरुवातीपासून रक्तदाब, हाय कोलेस्टेरॉल, हृदयविकार आजार होऊ नये व शरीर निरोगी राहावे या उद्देशाने प्रत्येकाने आहारामध्ये लसणाचा वापर नियमितपणे करावा. २) लसूण खाल्ल्याने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. अनावश्यक त्रासदायक जंतूंची वाढ थांबविली जाऊन संसर्गजन्य रोगांचा नाश केला जातो. तसेच शरीरास आवश्यक अशा उपयोगी जीवाणूंची वाढ केली जाऊन शरीर स्वास्थ्यपूर्ण बनविले जाते. ३) स्त्रियांची मासिक पाळी अनियमित येत असेल, तसेच रक्तस्राव व्यवस्थित होत नसेल, तर अशा वेळी चार-पाच लसणाच्या पाकळ्या तुपात तळून खाव्यात. ४) लसूणपेस्ट, खडीसाखर व सैंधव सम प्रमाणात घेऊन त्यात दुप्पट प्रमाणात तूप कालवून त्याचे चाटण करावे. हे चाटण चाटल्याने खोकला, सर्दी, श्वसनसंस्थेचे रोग, संधिवात, आमवात, अजीर्ण, अपचन, पोटात गॅस धरणे, मंदाग्नी, भूक न लागणे हे सर्व विकार दूर होतात.

५) लसूणपेस्ट अर्धा चमचा व अडुळशाच्या पानांचा रस दोन चमचे, गायीचे तूप एक चमचा हे सर्व मिश्रण एकत्र करून चाटण करावे. यामुळे जुनाट खोकला बरा होऊन क्षयरोग हा रोग आटोक्यात येतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वारी पंढरपूरची
## संत नरहरी सोनार

वारकरी संप्रदायाने जगाला दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे 'अद्वैत विचार' आणि 'धार्मिक समन्वय'. ज्या काळात समाजात शिवभक्त आणि विष्णूभक्त यांच्यात मोठे वाद चालत असत, त्या काळात साक्षात आपल्या कलेच्या आणि भक्तीच्या माध्यमातून हरी आणि हर (विठ्ठल आणि शिव) हे दोन नसून एकच आहेत हे सिद्ध करणारे संत म्हणजे संत नरहरी सोनार होय.



१३ व्या शतकात ज्ञानेश्वर माऊली आणि संत नामदेवांच्या समकालीन काळात होऊन गेलेल्या संतांमध्ये नरहरी महाराजांचे स्थान अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या एका हातातील फुंकणी आणि दुसऱ्या हातातील विठ्ठल भक्तीचा ताळ यांनी महाराष्ट्राच्या भूमीला एक नवा विचार दिला.

संत नरहरी सोनार यांचा जन्म १३ व्या शतकाच्या मध्यावर सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर या पवित्र नगरीतच झाला. त्यांचे घराणे सुवर्णकाराचे (सोनार) होते. त्यांचे वडील आणि आजोबा हे अत्यंत कुशल कारागीर होते, तसेच ते उपजतच कडक शिवभक्त होते.

नरहरी महाराजांना बालपणापासूनच घरातून शिवभक्तीचे कडक बाळकडू मिळाले होते. त्यांचे आराध्य दैवत पंढरपूर येथील मल्लिकार्जुन (महादेव) हे होते. नरहरी महाराजांची शिवभक्ती एवढी कट्टर होती की, ते पंढरपुरात राहत असूनही त्यांनी कधीही विठ्ठल मंदिराच्या शिखराकडे पाहिले नव्हते की ते कधी विठ्ठलाच्या दर्शनाला गेले नव्हते. शिवाशिवाय मी दुसऱ्या कोणत्याही दैवताची पूजा करणार नाही आणि त्याचे तोंडही पाहणार नाही, असा त्यांचा ठाम निश्चय होता.

वयात आल्यानंतर त्यांचा विवाह अत्यंत सुलक्षणी अशा 'गंगाबाई' यांच्याशी झाला. नरहरी महाराज आपल्या पंढरपूर येथील दुकानात सोन्या-चांदीचे अत्यंत सुंदर आणि कलाकुसरीचे दागिने घडवत असत. त्यांच्या कलेची ख्याती दूरदूरपर्यंत पसरली होती.

संत नरहरी सोनार यांच्या आयुष्याला आणि विचारांना पूर्णपणे कलाटणी देणारा एक अत्यंत अद्भूत चमत्कार पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात घडला, जो वारकरी संप्रदायाच्या इतिहासात सुवर्णअक्षरांनी लिहिला गेला आहे.

एकदा पंढरपूरमध्ये एक अत्यंत श्रीमंत सावकार आला. त्याला अपत्य (मुलगा) होत नव्हते. त्याने विठ्ठलाला नवस केला होता की, जर मला पुत्रप्राप्ती झाली, तर मी विठ्ठलाच्या कंबरेसाठी सोन्याचा अत्यंत मौल्यवान आणि जड अथांग करदोडा (कंबरपट्टा) अर्पण करीन. विठ्ठलाच्या कृपेने सावकाराला पुत्र झाला. आपला नवस फेडण्यासाठी तो सावकार पंढरपूरच्या बाजारात आला. सर्वांनी त्याला सांगितले की, असा अलौकिक आणि अचूक मापाचा दागिना फक्त एकच माणूस बनवू शकतो, ते म्हणजे नरहरी सोनार!

सावकार नरहरी सोनारांच्या दुकानात गेला आणि त्याने दागिन्याची ऑर्डर दिली. नरहरी महाराज म्हणाले, मी दागिना नक्की बनवीन, पण मापासाठी मी विठ्ठल मंदिरात येणार नाही. कारण मी शिवभक्त आहे आणि मी विठ्ठलाचे तोंड पाहत नाही. तुम्ही स्वतः विठ्ठलाच्या कंबरेचे माप दोरीने आणून मला द्या. सावकाराने होकार दिला. पुजाऱ्यांकडून विठ्ठलाच्या कंबरेचे अचूक माप दोरीने मोजून तो नरहरींकडे घेऊन आला.

नरहरी महाराजांनी आपल्या अफाट कौशल्याने त्या दोरीच्या मापाचा हुबेहूब आणि सुंदर सोन्याचा करदोडा तयार केला. सावकार आनंदाने तो दागिना घेऊन मंदिरात गेला. पुजाऱ्यांनी जेव्हा तो करदोडा विठ्ठलाच्या कंबरेला लावला, तेव्हा आश्चर्य म्हणजे तो करदोडा चार बोटे मोठा झाला!

सावकार परत नरहरींकडे आला. नरहरींनी तो कापून लहान केला. सावकार पुन्हा मंदिरात गेला, तर यावेळी तो करदोडा चार बोटे लहान पडला! असे चार ते पाच वेळा झाले. दोरीचे माप सारखे असतानाही दागिना मंदिरात गेल्यावर कधी मोठा तर कधी लहान व्हायचा. शेवटी सावकार कंटाळला आणि नरहरी महाराजांना म्हणाला, महाराज, तुमच्या हाताच्या स्पर्शाशिवाय हा दागिना विठ्ठलाला बसणार नाही. कृपया माझ्यासाठी मंदिरात चला.

नरहरी महाराज मंदिरात यायला तयार झाले, पण त्यांनी एक अट ठेवली: मी डोळ्यांवर घट्ट पट्टी बांधून मंदिरात येईन. मी विठ्ठलाचे रूप पाहणार नाही. फक्त हाताने स्पर्श करून कंबरेचे माप घेईन. सावकाराने ती अट मान्य केली.

डोळ्यांवर पट्टी बांधलेले नरहरी महाराज जेव्हा विठ्ठलाच्या गाभाऱ्यात आले आणि त्यांनी विठ्ठलाच्या मूर्तीला स्पर्श केला, तेव्हा त्यांच्या हाताला काहीतरी वेगळेच जाणवले. त्यांच्या हाताला विठ्ठलाच्या डोक्यावर जटा लागल्या! गळ्यात शेषाचा (सर्पाचा) वेढा लागला! अंगाला भस्म लागल्याचे जाणवले आणि कपाळावर त्रिनेत्र जाणवला!

नरहरी महाराज दचकले. त्यांनी मनात विचार केला, अरे, हा तर माझा आराध्य दैवत भगवान शिव शंभू आहे! सावकाराने मला फसवले, हा विठ्ठल नसून माझा महाकाल आहे. त्यांनी आनंदाने आपल्या डोळ्यांवरील पट्टी सोडून दिली. पण डोळ्यांवरील पट्टी काढताच समोर उभी होती साक्षात विठ्ठलाची कटेवर हात असलेली ती सावळी सुंदर मूर्ती!

नरहरींना वाटले की हा भास आहे. त्यांनी पुन्हा डोळ्यांवर पट्टी बांधली आणि मूर्तीला स्पर्श केला. पुन्हा हाताला शिवशंकराची त्रिशूळ, जटा आणि डमरू जाणवले. पुन्हा पट्टी काढली तर समोर विठ्ठल!

या अद्भुत चमत्काराने नरहरी सोनारांचे डोळे उघडले. त्यांना उमजले की, 'हरी आणि हर' (विठ्ठल आणि शिव) यांच्यात कोणताही भेद नाही. जो शिव आहे, तोच विठ्ठल आहे. विठ्ठलाच्या डोक्यावरील मुकुट म्हणजेच शिवाची पिंड आहे. नरहरी महाराज विठ्ठलाच्या चरणी कोसळले आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.

या प्रसंगानंतर संत नरहरी सोनार हे वारकरी संप्रदायाचे एक प्रमुख संत बनले. त्यांनी आपला शिवभक्तीचा अभिमान सोडला नाही, तर विठ्ठलालाच 'शिवरूप' मानून भक्ती सुरू केली. त्यांच्या दुकानातील कामाचे स्वरूप आता संपूर्ण आध्यात्मिक झाले होते. ते आपल्या व्यवसायालाच देवपूजा मानू लागले. त्यांनी सोन्याला 'आत्मा' आणि आपल्या शरीराला 'मुशी' (सोनं वितळवण्याचे पात्र) मानून अंतरंगाचा परमार्थ साधला. त्यांच्या दुकानात येणारा प्रत्येक ग्राहक हा त्यांच्यासाठी विठ्ठलाचे रूप झाला होता.

संत नरहरी सोनार यांची अभंगवाणी अत्यंत ओघवती आणि रूपकात्मक आहे. त्यांनी आपल्या सोनार व्यवसायातील संज्ञा वापरून अध्यात्माचे कठीण सिद्धांत अत्यंत सोप्या भाषेत मांडले आहेत. त्यांच्या अभंगांची मुद्रिका नरहरी सोनार म्हणे किंवा डोळस नरहरी अशी आढळते.

संत श्रेष्ठ नरहरी सोनार यांनी आपले उभे आयुष्य पंढरीनाथाच्या भक्तीत आणि शैव-वैष्णव संवादाचा प्रचार करण्यात घालवले. इसवी सन १३१३ (शके १२३५) च्या माघ वद्य तृतीयेला त्यांनी पंढरपूर येथेच देवाचे नामस्मरण करत आपले शरीर विठ्ठल चरणी समर्पित केले.

आज पंढरपूरमध्ये संत नरहरी सोनार महाराजांचे अत्यंत पवित्र आणि जुने मंदिर आहे. सुवर्णकार समाजासह संपूर्ण वारकरी संप्रदाय दरवर्षी माघ वद्य तृतीयेला त्यांची पुण्यतिथी मोठ्या भक्तीभावाने साजरी करतो. पंढरपूरच्या वारीला येणारा प्रत्येक भाविक नरहरी महाराजांच्या या अद्वैत भक्तीला वंदन केल्याशिवाय पुढे जात नाही.

संत नरहरी सोनार हे वारकरी परंपरेतील एक अत्यंत तेजस्वी रत्न आहेत. त्यांच्या भक्तीने सुवर्णालाही अधिक शुद्धता आणि तेज प्राप्त करून दिले.




रमेश देशपांडे
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## अन्न हे पूर्णब्रह्म

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




धीर खचणे याचेच दुसरे नाव मरणे. इच्छाशक्ती जागवणे हेच जगण्याला बळ देणे. प्रतिकारशक्ती हेच माणसाचे जिणे. सहनशक्ती हे माणसाचे लेणे. पण हे सगळे अंगी कसे बाणवणे? माणसाने यासाठी काय महत्त्वाचे लेखणे ? त्यासाठी ऋग्वेद पाहणे वैश्वानराय पृथुपाजसे विपो रत्ना विधन्त धरुणेषु गातवे। अनिर्हि देवाँ अमृतो दुवस्तत्यथा धर्माणि सनता न दुदुषत।।

माणसाने शंभर वर्षे सुखाने जगायचे, तर कुठे लक्ष द्यायचे? जाणकार ऋषींनी सांगितले की वैश्वानराला मनापासून भजायचे. वैश्वानर हा शक्तिमान अभी आहे. त्याच्या धगधगत्या ज्वालांचा प्रकाश दिपवून टाकणार आहे. त्याच्याच साह्याने माणसाला जीवनशक्ती प्राप्त करण्याची युक्ती गवसणार आहे. तो वैश्वानर अमर आहे. तो स्वतः सर्वशक्तिमान तत्त्वांच्या सेवेत तत्पर आहे. जीवनदायी सनातन मूल्यांचा तो चालक, पालक आणि मालक आहे. ती मूल्ये जो मानव मानणार नाही, तो दुर्गतीला गेल्याशिवाय राहणार नाही. हा वैश्वानर कुठे आहे? तो कसा ओळखवा? भगवदगीतेत भगवान श्रीकृष्ण सांगतात. अहं वैश्वानरोभूत्वां प्राणिनां देहमाश्रितः ।

सर्व प्राणिमात्रांच्या देहांत हा वैश्वानर आहे. तो जठराग्नी आहे. प्राणापानव्यानोदानसमाना तो प्राणवायू आहे. देहातील अशुद्ध वायू देहाबाहेर घालवणारा अपान वायू आहे. तो पचनाला मदत करणारा व्यान आहे. सर्व शरीरात रक्तादी प्राणपोषक तत्त्वे पसरविणारा उदान वायू आहे. शरीरस्वास्थ राखावे म्हणून कुठल्याही तत्त्वांचा प्रकोप होऊ न देता, सम प्रमाणात ही जीवनावश्यक शरीराअंतर्गत तत्त्वे सांभाळणारा तो समान वायू आहे. भगवान स्वतः तुमच्या उदरातच बसले आहेत. तुम्हाला सुखाने शंभर वर्षे जगवायला ते कार्यरत आहेत. पण तुम्हीच त्यांना न मानले तर? त्यांच्या आज्ञेत न राहिलात तर? अतिरेक करून या वायूंच्या कार्यात अडसर आणलात तर ? मग भगवंताचा नाइलज होईल. अकालमृत्यूला ते आमंत्रण ठरेल.

म्हणूनच आहार, खाणे, कधी न दुर्लक्षिणे, भोजन सुरू करण्यापूर्वी आपण वदनिकवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे म्हणतो की, सहज हवन होते नाम घेता फुकाचे। जिवन करि जिवित्वा अन्न हे पूर्णब्रम्ह उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ।।

पहिला घास तोंडात घेतानाच आठवण ठेवायची ती पोटातल्या वैश्वानराची. प्रत्यक्ष भगवंताची. मग खाण्याचा अतिरेक होणार नाही. भोगाऐवजी त्यागाची आठवण राहील, कारण जेवणे हा एक यज्ञ आहे हे लक्षात राहील.

बृहदारण्यक नावाच्या उपनिषदात एका राजपुत्राची कहाणी आहे. त्याचे नाव उपकोसल. तो हरित ऋषींच्या आश्रमात शिकायला आला होता. गुरुगृही तो सगळी कामे करी. गुरुपत्नी त्याला खूपच चमचमीत व गोडधोड अन्न रोज खायला घाली. राजपुत्र ते आवडले म्हणून भरमसाठ खाई.

तो गुरुपत्नीचा लाडका झाला, पण गुरूला नाही मानवला. गुरू सगळ्यांना प्रश्न विचारत, समजावून सांगत. पण या राजपुत्राकडे लक्षच देत नसत. राजपुत्राला वाईट वाटे. अशाने शिक्षण मिळणार कसे? ज्ञान येणार कसे? तो हिरमुसला. गुरुपत्नीला म्हणाला, गुरूंना मला शिकवायला सांगा. ते माझ्याकडे दुर्लक्ष करतात. गुरुपत्नीने गुरूंना सांगितले. पण गुरू नुसते हसले. पण पूर्वीप्रमाणेच दुर्लक्ष करीत राहिले.

मग उपकोसल उपोषणाला बसला. पण म्हणाला, हे उपोषण गुरूंच्या विरोधात नाही.

उपोषणाचा काही दिवसांतच चांगला परिणाम जाणवला. गुरुपत्नीने घातलेले चमचमीत मिष्टान्न खाऊन राजपुत्राला झोप येई. वर्गात लक्ष लागत नसे. गुरू काय शिकवतात ते समजेनासे होई. आता उपोषणाने आळस गेला. बुद्धी तरतरीत झाली. अंगी चपळता आली. उत्साह वाढला. गुरूने शिकवले ते सगळे समजू लागले. आठवू लागले. गुरूंना आता शंकानिरसन व्हावे म्हणून प्रश्न करावेसे वाटले. गुरुनेही राजपुत्राकडे संपूर्ण लक्ष देणे सुरू केले. राजपुत्र ज्ञानसंपन्न झाला. उपोषण आत्मशुद्धीसाठी होते. स्वतःचे दोष जाणावेत व घालवावेत यासाठी होते.

– किशोर गांधी

# तारकपूर येथील श्री झुलेलाल मंदिर येथे सिंधी समाजाच्या चालिहो उत्सवास प्रारंभ

नगर – सिंधी बांधवांच्या ४० दिवसाचा (१६ जुलै ते २४ ऑगस्ट) उपवासाचा पर्व अर्थात चालिहो साहिबची उत्साहात, श्रद्धाभावाने सुरुवात झाली. सिंधी कॉलनी, तारकपूर येथील श्री झुलेलाल मंदिर येथे चालिहो व्रत आरंभ निमित्त आयोजित कार्यक्रमात बहराणो साहिब ची पूजा, आरती, अखो, पल्लव तसेच भजन म्हणत उत्सवाचा प्रारंभ उत्साहात करण्यात आला. याप्रसंगी सिंधी जनरल पंचायत ट्रस्टचे कार्यकारणी सदस्य, श्री झुलेलाल मंदिर समिती सदस्य, महिला व पुरुष भाविक उपस्थित होते. याप्रसंगी प्रसाद वाटप करण्यात आले.

या शिवाय सावेडी येथील सतनाम साक्षी गोशाळेत तसेच गुलमोहर रोड वरील माता लालवारी झुलेलाल मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांनी चालिहो उत्सवास प्रारंभ करण्यात आला. चालिहो नावाच्या या धार्मिक सण उत्सवाला सिंधी समाजात आगळे वेगळे असे महत्त्व आहे,



चालिहो हा वरूण देवता झुलेलाल यांच्या पूजेशी संबंधित असून भगवान झुलेलाल हे सिंधी समाजाचे इष्टदेव आहे, चालिहो याचा अर्थ ४० दिवसाचा उपवास, व्रत, पूजा इत्यादी. झुलेलालदेव चे असंख्य भक्त ४० दिवसाचा उपवास करतात या काळात काही नियम पाळीत वरूण देवतेची पूजा व स्तुती करण्यात येते. मंदिरात जाऊन सामूहिक प्रार्थनेद्वारे समस्त मानव जातीच्या कल्याणाची भावना व्यक्त करीत वरूण देवतेकडे सगळीकडे चांगला पाऊस पडू दे व सुजलाम सुफलाम होऊ दे अशी प्रार्थना केली जाते.

सिंधी कॉलनी येथील श्री झुलेलाल मंदिरात पुढील ४० दिवस दररोज सायंकाळी आरती, पल्लव चा कार्यक्रम होणार असून नंतर भाविकांना प्रसाद वाटप करण्यात येईल, याशिवाय झुलेलाल चालीसा पाठ व भजनसंध्या कार्यक्रमांचे आयोजन ठिकठिकाणी चालिहो उत्सव काळात करण्यात येणार असून भाविकांनी लाभ घ्यावा असे आव्हान सिंधी जनरल पंचायत ट्रस्ट तर्फे करण्यात आले आहे.





आषाढी वारीनिमित्त केडगाव येथील श्री भैरवनाथ पायी दिंडीचे श्रीक्षेत्र पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले.

# भैरवनाथ पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान; टाळ, मृदंगाचा गजर अन् विठ्ठल नामाचा जयघोष

### भानुदास कोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी मार्गस्थ; सुभाश्री फाऊंडेशनच्यावतीने फिरते शौचालय भेट

नगर – आषाढी वारीनिमित्त केडगाव येथील श्री भैरवनाथ पायी दिंडीचे श्रीक्षेत्र पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामस्मरणात शेकडो वारकरी भाविकांनी दिंडीत सहभाग घेतला.

भैरवनाथ पायी दिंडी ही गेल्या ३५ वर्षांची अध्यात्मिक परंपरा जपत वारकरी संप्रदायातील सेवा, श्रद्धा, भक्ती, प्रेम आणि माणुसकीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य करत आहे. दिंडीचे मार्गदर्शक असलेले भानुदास एकनाथ कोतकर, सुरेखा भानुदास कोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीक्षेत्र पंढरपूरकडे बुधवारी सकाळी दिंडीचे प्रस्थान झाले.

उदयनराजे संदीप कोतकर यांनी सांगितले, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत परंपरेने समाजाला भक्ती, सेवा, समता आणि मानवतेचा मार्ग दाखविला आहे. पंढरपूरची वारी ही यात्रा नसून मन शुद्ध करणारी, समाजात बंधुभाव वाढविणारी व प्रत्येकाला अध्यात्माची अनुभूती देणारी पवित्र परंपरा आहे.

यावेळी भानुदास कोतकर, सुरेखा कोतकर, उद्योजक सचिन कोतकर, दिंडी चालक रामदास महाराज क्षीरसागर, मारुती महाराज जने, भागीनाथ बापू कोतकर, ईश्वर महाराज नवसुपे, भागवत महाराज सातपुते, भिमराज महाराज सातपुते आदी उपस्थित होते.

मार्गदर्शक भानुदास कोतकर यांच्या मार्गदर्शनाने माजी महापौर संदीप कोतकर यांच्या संकल्पनेतून सुभाश्री फाऊंडेशनच्यावतीने दिंडीतील वारकऱ्यांच्या सोयी सुविधांसाठी आणि महिलांसाठी फिरते शौचालय भेट देण्यात आले. दिंडीतील वारकऱ्यांची गैरसोय होत असल्याचे लक्षात घेऊन वारकऱ्यांना सुविधा मिळाव्यात, या हेतूने सुमारे दहा लाख रुपयांचे दहा फिरते शौचालय भेट देण्यात आल्याची माहिती सुभाश्री फाऊंडेशनचे अध्यक्ष उदयनराजे कोतकर यांनी दिली.

यावेळी आदित्ययनराजे कोतकर उपस्थित होते. दरम्यान, पंढरपूर येथील वारकर्यांच्या सुविधेसाठी संदीप दादा कोतकर युवा मंचच्यावतीने इलेक्ट्रिक गाडी भेट देण्यात आली होती. यंदाही कोतकर कुटुंबियांनी सामाजिक बांधिलकी जपत महिला वारकरी यांच्यासाठी केलेली शौचालयची सुविधा यामुळे महिलांमधून समाधान व्यक्त केले जातं आहे.

सर्वांनी दिंडीतील वारकऱ्यांना शुभेच्छा देत विठ्ठल-रुक्मिणी चरणी सर्वांच्या सुख-समृद्धीची प्रार्थना केली.

# केडगावात हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश

### पंढरीच्या वारकऱ्यांना मुस्लिम समाज बांधवांनी पुष्पगुच्छ देऊन दिल्या शुभेच्छा



केडगाव येथे पंढरीच्या वारीसाठी निघालेल्या भैरवनाथ पायी दिंडीतील वारकऱ्यांचे मुस्लिम बांधवांनी गुलाबपुष्प व फळे देऊन स्वागत केले. (छाया – समीर मन्यार)

नगर – भानुदास कोतकर परिवाराच्या पुढाकारातून पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या भैरवनाथ पायी दिंडीतील वारकऱ्यांचे केडगाव येथील मुस्लिम बांधवांनी गुलाबपुष्प व फळे देऊन स्वागत केले. धार्मिक सलोखा, सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. केडगाव येथून पंढरपूरकडे निघालेल्या भैरवनाथ दिंडीचे बुधवारी उत्साहात प्रस्थान झाले. विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी निघालेल्या वारकऱ्यांच्या या दिंडीचे मुस्लिम समाजाच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी वारकऱ्यांना गुलाबपुष्प देऊन फळांचे वाटप करण्यात आले.

महाराष्ट्र संतांची भूमी आहे येथे सर्वधर्मीयांच्या श्रद्धा, संस्कृती व परंपरांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रेम, बंधुभाव आणि सामाजिक एकात्मतेची परंपरा जपण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. केडगाव येथे झालेल्या या स्वागत सोहळ्यातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देण्यात आला.

यावेळी हाजी उस्मान मणियार म्हणाले, पंढरीची वारी ही महाराष्ट्राची महान आणि गौरवशाली परंपरा आहे. जात, पात, धर्म आणि पंथाच्या पलीकडे जाऊन माणुसकी व समतेचा संदेश देणारी ही वारी आहे. प्रत्येकाचा धर्म वेगळा असला, तरी श्रद्धा, प्रेम आणि माणुसकी एकच आहे. संतांनी आपल्याला एकता व बंधुत्वाची शिकवण दिली आहे. पंढरीच्या वारीच्या निमित्ताने आपण सर्वजण प्रेमाने व बंधुत्वाच्या भावनेने एकत्र आलो आहोत, हेच संतांच्या शिकवणीचे खरे रूप आहे.

यावेळी हाजी उस्मान मणियार, हुसेनभाई मंडपवाले, अब्दुलभाई बेकरीवाले, मुन्नाभाई सय्यद, दिलावरभाई मंडपवाले, बशीरभाई शेख, मोहम्मद पठाण, सिराज शेख, शकील शेख, अब्दुलभाई अंडेवाले, अतिश पठाण, असलम मणियार आदींसह केडगाव परिसरातील मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# 'जय जगन्नाथ'च्या जयघोषात खाकीदास बाबा मठात रथोत्सव उत्साहात साजरा

### 'श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी...' व 'हरे कृष्ण हरे राम'च्या भक्तिरसात लालटाकी परिसर न्हाऊन निघाला



खाकीदास बाबा मठात भगवान जगन्नाथांच्या रथोत्सवानिमित्त सत्यनारायणजी गोवर्धन झंवर व डॉ. नंदलाल तोष्णीवाल यांनी सपत्नीक हस्ते भगवान जगन्नाथांची मंगल आरती केली. (छायाचित्र – उदय जोशी)

नगर – लालटाकी रोडवरील खाकीदास बाबा मठात भगवान जगन्नाथांचा पारंपरिक रथोत्सव भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त सत्यनारायणजी गोवर्धन झंवर व डॉ. नंदलाल तोष्णीवाल यांनी सपत्नीक हस्ते भगवान जगन्नाथांची मंगल आरती केली. त्यानंतर भगवान जगन्नाथ, बलराम व सुभद्रा यांच्या रथाची मंदिर परिसरातून भक्तिमय मिरवणूक काढण्यात आली.

जय जगन्नाथ... जय जगन्नाथ..., हरे कृष्ण हरे राम, हरे राम हरे कृष्ण, श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी, हे नाथ नारायण वासुदेव तसेच अच्युतम् केशवं कृष्ण दामोदरम् या भक्तिगीतांच्या सुरावटींनी परिसर भक्तिमय झाला. टाळ-मृदंगाचा गजर आणि हरिनामाच्या अखंड घोषात भाविकांनी रथ ओढून भगवान जगन्नाथांचे दर्शन घेतले. वातावरणात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला.

या प्रसंगी चेअरमन दीपक काबरा, शिवदास डागा, चंद्रकांत काबरा, जितेंद्र बिहाणी, प्रवीण बजाज, रमेश आसावा, मनोज मुंदडा, सुनील मुंदडा, जगदीश दरक, श्रीकुमार सोनी, श्रीकांत काकाणी उपस्थित होते.

खाकीदास बाबा मठात दरवर्षी भगवान जगन्नाथांचा रथोत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. यानिमित्त मंदिर परिसरात दिवसभर धार्मिक कार्यक्रम, आरती, भजन-कीर्तन आणि दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती. ओडिशातील जगन्नाथ पुरी येथे सुरू असलेल्या जागतिक कीर्तीच्या रथयात्रेच्या निमित्ताने नगरातही हा उत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात आला. भगवान जगन्नाथ, बलराम आणि सुभद्रा यांच्या नगरभ्रमणाच्या परंपरेचे प्रतीक म्हणून काढण्यात आलेल्या या मिरवणुकीने परिसर भक्तिमय झाला होता.



पिंपरी येवला येथील दिंडीचे अरणगाव येथे भक्तिभावाने स्वागत करण्यात आले.

# पिंपरी येवला येथील दिंडीचे अरणगाव येथे भक्तिभावाने स्वागत

नगर – आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील विविध भागांतून दिंड्या पंढरपूरच्या दिशेने 'विठू-माऊली'चा जयघोषात मार्गक्रमण करत आहे. श्री क्षेत्र सिद्धेश्वर मंदिर, पिंपरी येवला, ता.जि. नाशिक येथील संत ज्ञानेश्वर त्यागी कानकद यांच्या नेतृत्वाखाली निघालेली दिंडी १५ जुलैला अहिल्यानगर तालुक्यातील अरणगाव येथे अर्जुन शिंदे यांच्या वस्तीवर आली असता दिंडीचे भक्तिभावाने स्वागत करण्यात आले.

यावेळी दिंडीतील सहभागी भाविकांना चहा व नाश्त्याची सोय शिंदे परिवाराच्या वतीने करण्यात आली होती. यावेळी परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. येथे अजय मिश्रा, सागर होनराव व अन्य मंडळींनी विठू-माऊलीचा गजर करीत विविध प्रकारची भक्तिगीते सादर केली. याप्रसंगी अर्जुन शिंदे, हरिभाऊ शिंदे, भाऊसाहेब शिंदे, बाबासाहेब दळवी, सुनील निमसे, अमोल दळवी, बाळासाहेब दळवी, गोरख गहिले, रोहिदास शिंदे, विजय शिंदे, सुरेश नाट, निखील गहिले, राजू गहिले, भागीनाथ शिंदे, मच्छिंद्र भालसिंग, भानुदास देवकर, निरंजन दळवी, पप्पू नाट, बबन दळवी, गेणू नाट, गुलाब नाट, सामंता शिंदे, ताराबाई शिंदे, जया दळवी, अर्चना शिंदे, ज्योती दळवी आदींनी परिश्रम घेतले.

# प्रत्येकाने नात्यांमध्ये समर्पण भाव ठेवला पाहिजे : प्रविणऋषीजी म.सा.

**कुंदनऋषीजी महाराज, प्रविणऋषीजी महाराज यांची सथ्था कॉलनी येथे आशीर्वादपर भेट**

नगर – अहिल्यानगर शहरातील आनंदधाम येथे आयोजित समर्पण चातुर्मासाची उत्कंठा वाढली असून २६ जुलै पासून चार महिने समर्पण, अध्यात्म, जप, तप, आत्मोन्नतीची दिशा दर्शवणारे अद्भुत मार्गदर्शन मिळणार आहे. यानिमित्त शहरात समर्पण धर्मयात्रा सुरू आहे. महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रविणऋषीजी म.सा. (आदी ठाणा ४) यांनी सथ्था कॉलनी येथील राजमल आदेश चंगेडिया यांच्या 'संभव' निवासस्थानी आशीर्वादपर भेट दिली. त्यांच्या समवेत आलोकऋषीजी म.सा., तीर्थेऋषीजी म.सा. उपस्थित होते. गुरूदेवांचे दर्शन आणि आशीर्वाद घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती.




समर्पण चातुर्मास निमित्त महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रविणऋषीजी म.सा. (आदी ठाणा ४) यांनी सथ्था कॉलनी येथील राजमल आदेश चंगेडिया यांच्या 'संभव' निवासस्थानी आशीर्वादपर भेट दिली. त्यांच्या समवेत आलोकऋषीजी म.सा., तीर्थेऋषीजी म.सा. उपस्थित होते.

यावेळी आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, समर्पण चातुर्मास समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच सथ्था कॉलनीतील अनिल पोखरणा, राजेंद्र चोपडा, वसंत पोखरणा, आनंदराम मुनोत, गिरीश अग्रवाल, संजय गुगळे, विजय गुगळे, नरेंद्र लोहाडे, शरद मुनोत, कमलेश मुनोत, आनंद गांधी, रोहित मुनोत, पवन गांधी, सचिन मुनोत, नरेश मुनोत, कुणाल गुगळे, विपुल गुगळे, विनय बोगावत, अमित पोखरणा, केतन मुनोत, आलोक मुनोत आदी उपस्थित होते. सथ्था कॉलनी महिला मंडळाने गुरूदेवांचे सुंदर पद्धतीने स्वागत केले.

प्रवचनात प्रविणऋषीजी महाराज म्हणाले, याठिकाणी आगामी चातुर्मास सजावटीचे सुंदर प्रतिबिंब पहायला मिळाले. आदेश चंगेडिया जाहिरात क्षेत्रात असल्याने त्यांना सौंदर्य दृष्टी आहे. त्याची प्रचिती सथ्था कॉलनीत पहायला मिळाली. यंदाचा चातुर्मास कुंदनऋषीजी महाराज यांच्या समर्पणाने होत आहे हे आवर्जून नमूद करतो. त्यांचे आशीर्वाद कायम सोबत राहिले आहेत. आयुष्यात समर्पण खूप महत्वाचे आहे. महाभारतात दुर्योधनाकडे समर्पण नव्हते, म्हणून तो पराजित झाला. अर्जुन भगवान श्रीकृष्णाप्रती समर्पित होता.

पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनासाठी जाणारा वारकरी समर्पित असतो, त्यामुळे तो उन वारा पावसाची तमा बाळगत नाही. मी आचार्यश्रींच्या पावन भूमीत समर्पणासाठी आलों आहे. भगवान से भक्ती नहीं होती, भक्तीसे भगवान मिलता है. मनुष्याने आपल्या नात्यांमध्येही समर्पण भाव ठेवला पाहिजे. समर्पण करणारांना भगवंताकडे काही मागण्याची गरज नसते. ज्या नात्यात मागणे आहे ते जास्त टिकत नाही. नात्यात अधिकाराची भाषा सुरू होते तेव्हा नाते गोत्यात आणतात हे सगळ्यांनी लक्षात ठेवावे.

कुंदनऋषीजी महाराज म्हणाले, उपाध्याय प्रविणऋषीजी महाराज यांचे अहिल्यानगर येथील आगमन आनंददायी आहे. आदेश चंगेडिया यांनी भक्तीभावाने आम्हाला सर्वांना सथ्था कॉलनीत निमंत्रित केले. राजमल आदेश चंगेडिया यांच्या निवासस्थानी मी यापूर्वीही भेट दिली होती. या परिवाराचा भक्तीभाव प्रसन्न करणारा असल्याने याठिकाणी येऊन समाधान लाभते. उपाध्यायश्रीजी व आमच्यात खूप गहिरे नाते आहे. त्यांना सर्वांनीच उपाध्यायश्रीजी नावानेच संबोधित करावे. ते शास्त्र पारंगत असून आपल्या प्रवचनातून मौलिक संदेश देत असतात. चातुर्मासात त्यांच्या मार्गदर्शन प्रवचनाचा सर्वांनी लाभ घ्यावा. त्यांचे प्रवचन जीवनाला दिशा देणारे ठरेल.

सचिन जगताप, महापौर ज्योतीताई गाडे यांनी नगरमधील समर्पण चातुर्मास सर्वांसाठी मोठी धार्मिक पर्वणी असल्याचे सांगत या कालावधीत आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

सुरूवातीला राजेंद्र चोपडा यांनी सथ्था कॉलनीतील सर्व परिवारांच्या वतीने गुरूदेव आणि उपस्थित भाविकांचे स्वागत केले.

अनिल पोखरणा यांनी प्रास्ताविकात सांगितले की, गुरूदेवांचे मंगल आगमन सथ्था कॉलनीसाठी आनंददायी आहे. उपाध्यायश्रीजी यांच्या महावीर गाथेचा कार्यक्रम याठिकाणी झाला होता. त्या आठवणी आजही स्मरणात आहे. आज पुन्हा एकदा त्यांनी येथे येऊन आशीर्वाद दिले आहेत. त्यांचा समर्पण चातुर्मास खऱ्या अर्थाने ऐतिहासिक ठरेल असा विश्वास आहे.

आदेश चंगेडिया म्हणाले, उपाध्यायश्री प्रविणऋषीजी म.सा. यांच्या समर्पण चातुर्मासामुळे संपूर्ण शहरात उत्साहाचे आणि भक्तीमय वातावरण तयार झाले आहे. यानिमित्त धर्मयात्रा सुरू असून महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज, उपाध्याय प्रविणऋषीजी महाराज यांनी मला नेहमीच वैयक्तिक खूप प्रेम व आशीर्वाद दिले आहेत, हे माझे भाग्य आहे. आज त्यांनी पुन्हा एकदा सथ्था कॉलनीत येऊन मार्गदर्शन केले आहे. चातुर्मासात सर्व भाविक श्रद्धेने गुरु कृपेचा लाभ घेतील. गुरूदेवांच्या प्रवचनाचा १ हजारांहून अधिक भाविकांनी लाभ घेतला. श्रद्धा आनंद गांधी यांनी आभार मानले.



आनंदधाम येथे यंदा उपाध्यायश्री प्रविणऋषीजी म.सा. यांचा समर्पण चातुर्मास २६ जुलै पासून सुरू होणार आहे. यानिमित्त शहरात चालू असलेल्या समर्पण चातुर्मास धर्मयात्रेमध्ये सहभागी झालेले भाविक.

# प्रविणऋषीजी महाराज यांचे १९ जुलै रोजी सारसनगर जैन स्थानकात आगमन

नगर – शहरातील आनंदधाम येथे यंदा उपाध्यायश्री प्रविणऋषीजी म.सा. यांचा समर्पण चातुर्मास २६ जुलै पासून सुरू होणार आहे. यानिमित्त शहरात समर्पण चातुर्मास धर्मयात्रा चालू आहे. या अंतर्गत प्रविणऋषीजी महाराज यांचे १९ जुलै रोजी सकाळी ७ वाजता सारसनगर जैन स्थानकात मंगल आगमन होणार आहे. त्यांच्या सान्निध्यात दिवसभर विविध धार्मिक व आध्यात्मिक मार्गदर्शन कार्यक्रम होतील, अशी माहिती सारसनगर श्रावक संघाने दिली.

उपाध्याय श्री प्रविणऋषीजी महाराज महात्मा फुले चौक, सारसनगर जुना पूल, सुपेकर हॉस्पिटल, शिवगंगा टॉवर चौक मार्गे सारसनगर जैन स्थानकात दाखल होतील. या दरम्यान त्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. अग्रभागी ऑर्गन बॅण्ड गाडी, २७ कलश मंडल, १४ स्वप्न मंडल, अर्हम विज्ञा मंडल, अष्टमंगल मंडल, पाठशाळा मंडल व श्रावक श्राविका असतील.

स्थानक प्रवेशानंतर उपाध्यायश्रीजींचे सकाळी ७.३० ते ९ या वेळेत प्रवचन होईल. सकाळी ९.३० वाजता सर्वांसाठी नवकारसीची व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी ११ ते १२ यावेळेत लहान मुलांसाठी पाठशाळा, दुपारी ३ ते ४ दरम्यान महिलांसमवेत धर्म चर्चा, ४ ते ५ यावेळेत युवतींना मार्गदर्शन आणि रात्री ८ ते ९ यावेळेत उपाध्यायश्रीजी श्रावक आणि युवा वर्गाशी चर्चा करणार आहेत.

या धर्मयात्रेनिमित्त उपाध्यायश्रीजींच्या पावन सान्निध्याचा आणि अनमोल मार्गदर्शनाचा लाभ भाविकांना मिळणार आहे. सर्व कार्यक्रमांना श्रावक श्राविकांनी सहपरिवार उपस्थित राहावे असे आवाहन सारसनगर जैन श्रावक संघाने केले आहे.

# फिनिक्स फाऊंडेशनने वारकऱ्यांना पुरवली आरोग्यसेवा

नगर – आषाढी वारीसाठी पंढरपूरला निघालेल्या वारकऱ्यांची दिंडी सुखकर होण्यासाठी फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने आरोग्य सेवा पुरविण्यात आली. शहरातून मार्गक्रमण झालेल्या विविध दिंडीतील हजारो वारकऱ्यांची तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीमध्ये नेत्र व आरोग्य तपासणी करुन त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले. तर दिंडीत मरणोत्तर नेत्रदान व अवयवदानची जागृती करण्यात आली.



गेल्या २४ वर्षापासून फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे हा उपक्रम राबवत असून, दरवर्षी संत निवृत्तीनाथ महाराज (नाशिक), मुक्ताई महाराज (जळगाव), जंगले शास्त्री महाराज (डोंगरगण) आदी लहान–मोठ्या दिंडीतील वारकऱ्यांना आरोग्य सुविधा पुरविण्याचे कार्य सातत्याने सुरु आहे. ज्या वारकऱ्यांना औषधोपचाराची गरज भासली त्यांना मोफत औषधोपचार देखील करण्यात आले.

जालिंदर बोरुडे म्हणाले की, वारकऱ्यांच्या सेवेतून पांडूरंगाच्या भक्तीचा आनंद मिळतो. वारकरी सांप्रदाय समाज जागृतीचे कार्य करत असून, त्यांच्या माध्यमातून मरणोत्तर नेत्रदान व अवयवदान चळवळ यशस्वी होणार आहे. वारकऱ्यांना आरोग्य सेवा देताना दिंडीत नेत्रदान व अवयवदान चळवळीची जागृती देखील सातत्याने सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. तर नामस्मरणाने अंतकरण शुद्ध होते तर बाह्य शरीरासाठी आरोग्य जपणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या उपक्रमासाठी फिनिक्स सोशल फाऊंडेशनला महंत ह.भ.प. भास्करगिरी महाराज, ह.भ.प. जंगले शास्त्री महाराज यांचे मार्गदर्शन लाभत आहे. आरोग्य सेवेसाठी डॉ. एस.जे. खन्ना, इंजि. अनिल साळुंके, केमिस्ट असोसिएशनचे संचालक सागर फुलसौंदर, रोटरीचे ॲड. हेमंत कराळे, वैभव दानवे, गौरव बोरुडे, सौरभ बोरुडे, कृष्णा फुलसौंदर आदींनी योगदान दिले.

**विद्या प्रतिष्ठान (महाराष्ट्र) नगर केंद्र संचलित**

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉक्टर शिवाजीराव देसाई यांची नियुक्ती

नगर – विद्या प्रतिष्ठान (महाराष्ट्र) संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नवनियुक्त प्राचार्य डॉ. शिवाजीराव देसाई यांनी पदभार स्वीकारला. यानिमित्त महाविद्यालयात स्वागत व अभिनंदन समारंभ झाला. या प्रसंगी संस्थेचे सहकार्यवाह मा. प्राचार्य डॉ. रवींद्र चोभे यांनी डॉ. देसाई यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमास प्र. प्राचार्य डॉ. अमरनाथ कुमावत, उपप्राचार्य डॉ. गोकुळदास लोखंडे, तसेच गोखले एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेरचे प्राचार्य डॉ. कैलास दौंडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. शिवाजीराव देसाई यांची नियुक्ती झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी डॉ. शिवाजीराव देसाई यांनी अमनोगतात महाविद्यालयाच्या गुणवत्ता वृद्धी, शैक्षणिक उत्कृष्टता, संशोधन संस्कृती, डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर तसेच विद्यार्थी–केंद्रित शिक्षण यावर भर देत महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता व्यक्त केली. गुणवत्तापूर्ण शिक्षण, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि संघभावनेच्या बळावर महाविद्यालयाला नवीन उंचीवर नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, प्राध्यापकेतर सहकारी उपस्थित होते.



नवी पेठ येथील जैन स्थानकात आनंद चालिसा पाठ वर्षपूर्ती साजरी करण्यात आली.

# आनंद चालिसा पाठ जीवनाचे सार्थक करणारा

**कुंदनऋषीजी महाराज यांचे प्रतिपादन; नवीपेठ जैन स्थानकात आनंद चालिसा पाठची वर्षपूर्ती**

नगर – आताच्या काळात प्रचंड धावपळ आणि सतत जिंकण्याच्या स्पर्धेमुळे मानसिक शांतता कमी होत आहे. यासाठी जप तप आराधना आणि धर्मांतरण महत्वाचे आहे. आचार्यश्रींचे कृपाशीर्वाद असलेल्या अहिल्या नगरमध्ये भाविक श्रद्धेने धर्माचरण करतात. नवीपेठ येथील जैन स्थानकाला अनेक तपस्वींचे सान्निध्य लाभले आहे. याठिकाणी एक प्रकारची सकारात्मक ऊर्जा आहे. येथे वर्षभरापासून दर शुक्रवारी रात्री आनंद चालिसा पाठ अखंडपणे चालू आहे. आबालवृद्ध भाविक यात सहभागी होतात. अशा धार्मिक कार्यांमुळे समाजात आनंद वाढतो, आत्मिक समाधान मिळून नवचैतन्य येते. आनंद चालिसा पाठ जीवनाचे सार्थक करणारा आहे, अशा भावना महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज यांनी व्यक्त केल्या.

नवी पेठ येथील जैन स्थानकात आनंद चालिसा पाठ वर्षपूर्ती साजरी करण्यात आली. यावेळी आलोकऋषीजी म.सा., जैन श्रावक संघाचे सेक्रेटरी संतोष गांधी, जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, सुभाष भंडारी, पारस लोढा, भरत बागरेचा, सचिन डागा, आनंद मुथा, बाबालाल गांधी, हेमंत मुथा, अमोल कटारिया, मनिषा मुनोत, मिनाताई मुनोत, ममता कटारिया आदी उपस्थित होते.

प्रारंभी वंदना काठेड यांनी स्वागत गीत गायले. जय आनंद महावीर युवक मंडळाने प्रभावना दिली.

स्वागत शैलेश मुनोत यांनी केले तर सचिन डागा यांनी आभार मानले. सकारात्मक विचार आणि ऊर्जा देणारा आनंद चालिसा पाठ उपक्रम भविष्यातही कायम राखण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

दर शुक्रवारी रात्री ९ वाजता होणाऱ्या आनंद चालिसा पाठ कार्यक्रमात भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आनंद चालिसा पाठ मंडळातर्फे करण्यात आले आहे.



रेसिडेन्शिअल हायस्कूल, अहिल्यानगर येथे इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ पार पडला.

# रेसिडेन्शिअल हायस्कूलचा शिष्यवृत्ती परीक्षेत मानाचा तुरा

**३ राज्य गुणवत्ताधारक, ५२ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र**

नगर – रेसिडेन्शिअल हायस्कूल, अहिल्यानगर येथे इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव मुकेश मुळे तसेच खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे उपस्थित होत्या.

यावर्षी इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाचे ३ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवण्यात यशस्वी झाले असून २१ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. तसेच इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाचे ३१ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचा, पालकांचा व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य जाधव व्ही. यांनी प्रास्ताविक करत शिष्यवृत्ती परीक्षेचा सविस्तर लेखाजोखा मांडला. विद्यार्थ्यांनी मनोगतातून यशामागील परिश्रम, नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यांचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रमुख पाहुणे मुकेश मुळे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे वाढते महत्त्व समजावून सांगितले. भविष्यातील तंत्रज्ञानाच्या गरजा लक्षात घेऊन लवकरच संस्थेमार्फत विद्यार्थ्यांसाठी कोडींग शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची आनंददायी घोषणा त्यांनी केली.

अध्यक्षीय समारोपात रामचंद्र दरे यांनी विद्यालयाने शिष्यवृत्ती परीक्षेतील उज्वल निकालाची परंपरा कायम राखल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या यशामागील शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य यांचे कौतुक करत सर्वांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाला विद्यालयाचे उपमुख्याध्यापक पवार बी. एम., पर्यवेक्षक म्हस्के डी. सी., शरद सोनवणे, सौ. मरकड व्ही. के., सौ. वैशाली दारकुंडे तसेच शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र देवढे यांनी केले, तर उपप्राचार्य वांढेकर सर यांनी आभार मानले.

विद्यार्थ्यांना नारळे जे. एन., कुटे एच.डी., सौ. मरकड व्ही. के, ठुबे एम. यू, काळदाते जे. एस., चव्हाणके ए., सौ. धामणे जे. एस., पाटील पी. ए., सौ. दरे एस. बी., सौ. हराळ एम.पी., म्हस्के पी. बी., सौ. साठे एस. पी., सौ. निवडुंगे जे. एस., अमृते पी. एम., गावडे आर. आर. यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'आयएमएस' च्या प्रभारी संचालकपदी डॉ. प्रणोती तेलोरे

नगर – नगरमधील बी.पी. एच. ई. सोसायटीच्या आय. एम. एस. सी. डी. आर. संस्था अहिल्यानगरमध्ये व्यवस्थापन व माहिती तंत्रज्ञान अशा शैक्षणिक कार्यात गेली ३२ वर्षे उल्लेखनीय कार्य करत आहे. या संस्थेच्या प्रभारी संचालकपदी डॉ. प्रणोती तेलोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बी.पी. एच. ई. सोसायटीचे सचिव विशाल बार्नबस यांच्या हस्ते नूतन प्रभारी संचालक डॉ. तेलोरे यांचा सत्कार करण्यात आला.



डॉ. प्रणोती तेलोरे या आयएमएस संस्थेत गेली २५ वर्षे ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. प्राध्यापिका, व्यवस्थापन विभाग प्रमुख, संशोधिका, विद्यावाचस्पती मार्गदर्शिका या पदांवर कार्य करत असताना त्यांचे विद्यार्थीहिताचे निर्णय, शिस्तप्रिय सहकारी हितचिंतक, विद्यार्थीप्रिय शैक्षणिक उपक्रम हे प्रेरणादायी आहे.

आय. एम. एस. च्या जडणघडणीत बी. पी. एच. ई. सोसायटीचे डॉ. जे. बार्नबस, फिलीप बार्नबस, डॉ. आर. जे. बार्नबस, विशाल बार्नबस यांचे विशेष योगदान व मार्गदर्शन लाभले आहे. माजी सरसंचालक डॉ. एस. बी. कोलते तसेच संचालक डॉ. व्ही. एस. दिकोडा, प्रा. पी. ए. लक्ष्मणअय्या, तत्कालीन संचालक डॉ. एम. बी. मेहता यांनी संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत कार्य केले आहे.

विशाल बार्नबस यांनी आय. एम. एस. संस्थेला सर्वोत्तम कार्यासाठी पूर्णपणे समर्थन देण्यास सोसायटी कटिबद्ध आहे, असे सांगितले. नवीन शैक्षणिक कार्यक्रमांचा परिचय, मजबूत उद्योग सहकार्य, डिजिटल परिवर्तन, संशोधन नवोन्मेष आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रम हे भविष्याच्या मोठ्या संधी आहेत. आपण संस्थेला शिक्षण क्षेत्रातील एक आदर्श संस्था म्हणून उभी करू. व्यवस्थापन शिक्षणामध्ये एक आदर्श संस्था म्हणून उभे करण्यासाठी प्रयत्न केले जातील. हा फक्त जबाबदाऱ्या हस्तांतरित करण्याचा औपचारिक कार्यक्रम नाही, तर एक नेता दुसऱ्या नेत्याकडे अनुभव, मूल्ये आणि दृष्टिकोन हस्तांतरित करण्याचे प्रतीक आहे. ज्यामुळे प्रगती आणि उद्देशाची सलगता सुनिश्चित होते. तसेच डॉ. मेहता यांचे आयएमएस साठी त्यांच्या सातत्यपूर्ण समर्पण आणि योगदानाबद्दल आभार मानले.

डॉ. एम. बी. मेहता यांनी डॉ. तेलोरे यांच्या कार्याचा गौरव करत भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, आय. टी. विभाग प्रमुख डॉ. महेश पोतदार, ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. स्वाती बार्नबस, वित्त विभाग प्रमुख नरेंद्र कदम, प्रशासन विभाग प्रमुख महेश दीक्षित, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. एम. एन. सय्यद यांनी केले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## यलो गोल्ड आणि व्हाईट गोल्डमधील फरक

सोन्याचे दागिने खरेदी करताना आजकाल ग्राहकांसमोर एक मोठा प्रश्न असतो... पारंपरिक 'यलो गोल्ड' (पिवळे सोने) घ्यावे की आधुनिक 'व्हाईट गोल्ड' (पांढरे सोने) बदलत्या फॅशन ट्रेंडमुळे आणि गुंतवणुकीच्या नव्या दृष्टिकोनामुळे हा निर्णय घेणे कठीण झाले आहे. आजची तरुण पिढी मॉडर्न लूकसाठी व्हाईट गोल्डला पसंती देत आहे, तर अनेकजण आजही परंपरा आणि विश्वासासाठी पिवळ्या सोन्यालाच पसंती देतात. व्हाईट गोल्ड आणि यलो गोल्ड दोन्हीमध्ये 'असली' सोनेच असते, मात्र त्यांचा रंग आणि बनावट वेगळी असते.



**यलो गोल्ड (पिवळे सोने) :** हजारो वर्षांपासून भारतात पिवळ्या सोन्याला मोठी मागणी आहे. हे सोने शुद्धता आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. पिवळे सोने तयार करण्यासाठी शुद्ध सोन्यात तांबे आणि चांदी या धातूंचे मिश्रण केले जाते. लग्नसराई आणि पारंपरिक सणांवेळी आजही पिवळ्या सोन्याच्या दागिन्यांची सर्वाधिक विक्री होते.

**व्हाईट गोल्ड (पांढरे सोने) :** हे आधुनिक काळातील तरुण पिढीची पहिली पसंती बनले आहे. हे सोने तयार करण्यासाठी सोन्यात निकेल किंवा पॅलेडियम सारखे धातू मिसळले जातात. यावर 'रोडिअम'ची कोटिंग केली जाते, ज्यामुळे याला चांदीसारखा चमकदार पांढरा रंग येतो. विशेषतः, हिऱ्याच्या दागिन्यांसाठी व्हाईट गोल्डचा सर्वाधिक वापर केला जातो. पारंपरिक आणि शाही लूकसाठी यलो गोल्ड, तर वेस्टर्न आणि मॉडर्न लूकसाठी सहसा व्हाईट गोल्डचा वापर केला जातो. जर तुम्ही फॅशन आणि सध्याच्या ट्रेंडला महत्त्व देत असाल, तर वेस्टर्न कपड्यांवर व्हाईट गोल्ड हा एक उत्तम पर्याय आहे.

मात्र, जर तुम्ही दागिन्यांकडे एक 'गुंतवणूक' म्हणून पाहत असाल, तर पिवळे सोने अधिक फायदेशीर ठरते. व्हाईट गोल्डची चमक टिकवून ठेवण्यासाठी वेळोवेळी पॉलिश आणि कोटिंगचा खर्च करावा लागतो, जो पिवळ्या सोन्याच्या बाबतीत कमी असतो. पिवळे सोने हे गुंतवणुकीसाठी अत्यंत सुरक्षित मानले जाते. व्हाईट गोल्डचा गुंतवणुकीपेक्षा फॅशनसाठी अधिक वापर होतो. पिवळ्या सोन्याची पुनर्विक्री किंमत चांगली मिळते. मेकिंग चार्जेस आणि कोटिंगमुळे व्हाईट गोल्डची किंमत काहीशी कमी होऊ शकते.


पिवळ्या सोन्याची देखभाल करणे सोपे आहे. ठराविक काळानंतर व्हाईट गोल्डवर रोडिअम कोटिंग पुन्हा करावी लागते. त्यामुळे जर तुम्ही फॅशन आणि सध्याच्या ट्रेंडला महत्त्व देत असाल, तर वेस्टर्न कपड्यांवर व्हाईट गोल्ड हा एक उत्तम पर्याय आहे. मात्र, जर तुम्ही दागिन्यांकडे एक 'गुंतवणूक' म्हणून पाहत असाल, तर पिवळे सोने अधिक फायदेशीर ठरते, असे तज्ज्ञ सांगतात. व्हाईट गोल्डची चमक टिकवून ठेवण्यासाठी वेळोवेळी पॉलिश आणि कोटिंगचा खर्च करावा लागतो, जो पिवळ्या सोन्याच्या बाबतीत कमी असतो.

◆◆◆

## 'एआय'चा फुगा फुटणार?

'एआय' स्वप्नाचा पाठलाग करण्यासाठी तंत्रज्ञान उद्योगाने यावर्षी विशेष चिप्स आणि डेटा सेंटर्सवर सुमारे ४०० अब्ज डॉलर खर्च केले आहेत. या विशेष चिप्स जुन्या होण्यापूर्वी त्या किती काळ टिकतील, याबद्दलच्या अटकळींमुळे गुंतवणूकदार धास्तावले आहेत. 'एआय'चा फुगा फुटण्याच्या सततच्या भीतीमुळे आणि अमेरिकन अर्थव्यवस्थेचा मोठा हिस्सा आता 'एआय'च्या तेजीवर अवलंबून असल्याने, जेव्हा सत्य परिस्थिती समोर येईल तेव्हा ती अत्यंत भीषण आणि खर्चिक असू शकते, असा इशारा विश्लेषक देत आहेत.

चॅटजीपीटी मुळे सुरू झालेल्या 'एआय' लाटेपूर्वी, क्लाऊड कॉम्प्युटिंग क्षेत्रातील दिग्गज कंपन्या असे गृहीत धरत असत की, त्यांच्या चिप्स आणि सर्व्हर्स साधारणपणे सहा वर्षे टिकतील. परंतु, प्रिन्स्टन युनिव्हर्सिटीच्या सेंटर फॉर इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी पॉलिसीचे मिहीर क्षीरसागर म्हणतात की, वापर आणि झीज यासोबतच तांत्रिकदृष्ट्या जुने होण्याच्या प्रक्रियेमुळे सहा वर्षांचे गृहीतक टिकवून ठेवणे कठीण आहे.



चिप निर्माते एनव्हिडियाहे पूर्वीपेक्षा अधिक वेगाने नवीन आणि अधिक शक्तिशाली प्रोसेसर बाजारात आणत आहेत. आपली प्रमुख ब्लॅकवेल चिप लाँच केल्यानंतर एका वर्षापेक्षा कमी कालावधीत एनव्हिडीयाने जाहीर केले की, २०२६ मध्ये रुबिन ही चिप येईल, जिची कार्यक्षमता ७.५ पटीने जास्त असेल.

आर्थिक सल्लागार संस्था डी. ए. डेव्हिडसनचे गिल लुरिया यांनी चेतावणी दिली की, या वेगामुळे चिप्स त्यांच्या बाजार मूल्याच्या ८५ ते ९० टक्के मूल्य तीन ते चार वर्षांतच गमावतात. एनव्हिडीयाचे सीईओ जेन्सन हुआंग यांनी मार्चमध्ये स्वतः ही बाब स्पष्ट करताना सांगितले होते की, जेव्हा ब्लॅकवेल लाँच झाली, तेव्हा कोणालाही जुन्या पिढीची चिप नको होती. 'एआय' प्रोसेसर पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात निकामी होत आहेत. ते इतके गरम होतात की, कधीकधी उपकरणे जळून खाक होतात. मेटा कंपनीने त्यांच्या ललामा एआय मॉडेलवर केलेल्या अलीकडील अभ्यासात वार्षिक बिघाडाचे प्रमाण ९ टक्के असल्याचे आढळले आहे.

डेटा सेंटर्स उभारण्यासाठी मोठ्या भांडवलाची गरज असते. जर उपकरणे वारंवार बदलावी लागल्यामुळे या कंपन्या कमी नफा कमावताना दिसल्या, तर त्यांना भांडवल उभे करणे अधिक महाग पडेल. काही कंपन्यांनी चिप्सनाच तारण ठेवून कर्ज घेतले असल्याने परिस्थिती अधिक गंभीर आहे.

◆◆◆

## प्रसूती वेदनांर संगीतोपचार प्रभावी

भारतीय संगीत थेरपी प्रसूती कळा सोसणाऱ्या महिलांमधील वेदना आणि चिंता लक्षणीयरीत्या कमी करते. हा निष्कर्ष डॉ. बी. आर. आंबेडकर स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, मोहाली येथील डॉक्टरांनी भारतात अशा प्रकारच्या पहिल्याच अभ्यासाद्वारे काढला आहे. 'एम्स'च्या संचालिका प्रिन्सिपल डॉ. भवनीत भारती यांच्या नेतृत्वाखाली सहा डॉक्टर आणि दोन परिचारिकांनी केलेल्या या रँडमाईज्ड कंट्रोल्ड ट्रायलमध्ये असे दिसून आले की, ज्या महिलांना मानक प्रसूती उपचारांसोबत भारतीय संगीत थेरपी देण्यात आली, त्यांच्या वेदनांमध्ये त्वरित २७ टक्के आणि चिंतेमध्ये ६७ टक्के घट झाली. विशेष म्हणजे हा सकारात्मक परिणाम दीर्घकाळ टिकून राहिला. या संशोधनामुळे संगीत थेरपी हे केवळ एक वरवरचे साधन नसून एक प्रभावी क्लिनिकल टूल असल्याचे सिद्ध झाले आहे.

डॉ. भारती यांनी सांगितले की, हा प्रवास संगीतापासून नाही, तर स्तनपानापासून सुरू झाला. प्रसूतीनंतर लवकर स्तनपान सुरू करण्याच्या सवयीवर काम करत असताना आमच्या लक्षात आले की, जोपर्यंत मातांना भावनिकदृष्ट्या सुरक्षित वाटत नाही, तोपर्यंत केवळ वैद्यकीय प्रोटोकॉल यशस्वी होऊ शकत नाहीत. लेबर रूममधील चिंता आणि भीती हे मोठे अडथळे होते. संगीताने आम्हाला प्रसूती प्रक्रियेचे मानवीयकरण करण्यास मदत केली आणि नंतर आम्ही त्याचे



परिणाम वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध केले. हा अभ्यास डॉ. भारती यांच्या स्किन-टू-किन कॉन्टॅक्ट (आई आणि बाळाचा शारीरिक स्पर्श) आणि लवकर स्तनपान सुरू करण्याच्या कामातून विकसित झाला. प्रशिक्षित कर्मचारी आणि मजबूत प्रोटोकॉल असूनही, परिणाम सातत्यपूर्ण नव्हते. त्यातून असा निष्कर्ष निघाला की, लेबर रूम जरी वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असल्या, तरी त्या भावनिकदृष्ट्या तणावपूर्ण असू शकतात, ज्यामुळे आई आणि बाळाचे नाते आणि सहकार्य यामध्ये अडथळा येतो. म्हणून लक्ष रिस्पेक्टफुल मॅटर्निटी केअर (आदरयुक्त मातृत्व सेवा) परिसंस्थेवर केंद्रित करण्यात आले. या प्रक्रियेत डॉ. अंजली यांचा सहभाग हा महत्त्वाचा ठरला.

डॉ. अंजली या लखनौच्या भातखंडे संगीत विद्यापीठातून भारतीय शास्त्रीय संगीताचे औपचारिक शिक्षण घेतलेल्या डॉक्टर आहेत. त्यांच्याकडे मानसशास्त्राची पार्श्वभूमी आणि संगीत थेरपीमध्ये पीएच.डी. आहे. त्यांच्या कौशल्यामुळे संगीताचे रूपांतर केवळ करमणुकीत न राहता, ते न्यूरोसायन्स आणि संस्कृतीवर आधारित एक संरचित उपचार पद्धती बनले.

नेहमीच्या अभ्यासांमध्ये सामान्य वाद्यसंगीत वापरले जाते. परंतु, 'एम्स'चा हा प्रयोग वैयक्तिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अर्थपूर्ण होता. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मातांना त्यांच्या भावनिक स्थितीनुसार शब्दबद्ध रचना, भक्ती संगीत आणि भारतीय शास्त्रीय रागांवर आधारित संगीत ऐकवण्यात आले. डॉ. भारती यांच्या मते, 'प्रसूती ही केवळ शारीरिक प्रक्रिया नसून ती भावनिक आणि आध्यात्मिकदेखील आहे. संगीतामुळे मातांना आश्वस्तता, सन्मान आणि ओळखीची भावना मिळाली.'

या अभ्यासाची विश्वासार्हता जपण्यासाठी टीमने एक औपचारिक चाचणी आराखडा तयार केला. यामध्ये प्रसूती कळा सुरू असलेल्या ११७ महिलांची निवड करण्यात आली. संगणक-व्युत्पन्न रँडमायझेशन वापरून, सहभागींना दोन गटांत विभागले गेले. एका गटाला फक्त मानक उपचार दिले गेले, तर दुसऱ्या गटाला मानक उपचारांसोबत भारतीय संगीत थेरपी देण्यात आली.

◆◆◆

## ओबामाही आहेत ज्ञानेश्वरप्रेमी!

संत ज्ञानेश्वरांच्या भगवद्गीतेवरील मराठी भाष्य असलेल्या 'भावार्थ दीपिका' म्हणजेच ज्ञानेश्वरीच्या शेवटी 'पसायदान' ही सुंदर प्रार्थना येते. संत ज्ञानेश्वरांनी यामधून विश्वात्मक परमेश्वराकडे सर्वांच्या कल्याणासाठीची




प्रार्थना केलेली आहे. आता याच पसायदानावर तयार करण्यात आलेली सांगीतिक रचना ही अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या आवडत्या रचनांच्या यादीत समाविष्ट झालेली आहे.

ओबामा हे आजही जगातील सर्वात लोकप्रिय व्यक्तींपैकी एक असून, सोशल मीडियावरही ते प्रचंड सक्रिय आहेत. त्यांनी नुकत्याच केलेल्या एका पोस्टने भारतीयांचं लक्ष वेधून घेतलं आहे. जगातील सर्वात प्रभावशाली व्यक्तींपैकी एक असलेले ओबामा हेसुद्धा ज्ञानेश्वरांच्या रचनांचे चाहते आहेत असं सांगितलं, तर तुम्हाला आधी यावर कदाचित विश्वास बसणार नाही; पण हे खरं आहे आणि ही माहिती स्वत: ओबामा यांनी दिली आहे. ओबामांचं थेट मराठी आणि त्यातही ज्ञानेश्वरांच्या रचनांशी काय कनेक्शन आहे, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल, तर तुम्ही ओबामांनी शेअर केलेली एक यादी वाचायलाच हवी.

खरं तर बराक ओबामा दर वर्षाच्या शेवटच्या १५ दिवसांमध्ये त्यांनी वर्षभरात वाचलेली पुस्तके, पाहिलेले चित्रपट आणि ऐकलेल्या गाण्यांपैकी आवडलेल्या गोष्टींची यादी शेअर करतात. अगदी इंग्रजीपासून ते अनुवादित साहित्यापर्यंत अनेक गोष्टी ओबामा वाचतात. असाच प्रकार चित्रपटांसंदर्भात आहे. ओबामांना कलेविषयी विशेष आवड असल्याने ते वेगवेगळ्या भाषांमधील गाणी ऐकतात. याच गाण्यांपैकी त्यांना २०२५ मध्ये आवडलेली अव्वल ३० गाणी कोणती, हे एक पोस्ट शेअर करत फॉलोअर्सला सांगितलं आहे.

याच गाण्यांच्या यादीमध्ये ज्ञानेश्वरांच्या पसायदानाचा समावेश ओबामांनी केला आहे. गणव्य नावाच्या अमेरिकन गायिकेनं ज्ञानेश्वरांच्या पसायदान या प्रार्थनेचे संगीतबद्ध रूप तयार केले आहे, ते ओबामा यांना एवढं आवडलं आहे की, त्याचा त्यांनी या वर्षीच्या आपल्या टॉप ३० गाण्यांमध्ये समावेश केला आहे. ओबामांकडून सांगितली जाणारी गाणी मोठ्या संख्येनं ऐकली जातात आणि त्यांची चर्चा होते. त्यामुळेच आता 'पसायदान' हे अधिकाधिक इंग्रजी लोकांपर्यंत या माध्यमातून पोहोचेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

◆◆◆

## पालक शिजवून खावा की कच्चा?

जेव्हा जेव्हा लोहयुक्त भाज्यांचा विषय निघतो तेव्हा सर्वप्रथम पालकचे नाव घेतले जाते. हिरव्या पालेभाज्यांमध्ये पालक पौष्टिक ऊर्जाघर मानले जाते, कारण त्यात लोह, जीवनसत्त्वे ए, सी, के, फायबर आणि अँटिऑक्सिडंटस् समृद्ध असतात; परंतु पालक कच्चा किंवा शिजवलेला खाणे अधिक फायदेशीर आहे का, हा एक मोठा प्रश्न लोकांच्या मनात नेहमी असतो.

बरेच लोक कोशिंबीर आणि स्मूदीमध्ये कच्चे पालक पसंत करतात, तर काही लोक पालक भाजी, मसूर किंवा सूपमधून खाणे पसंत करतात. सत्य हे आहे की आपण पालक ज्या प्रकारे खाता त्यावरून आपल्याला किती लोह मिळेल आणि त्याचा आपल्या पचनक्रियेवर कसा परिणाम होईल हे निर्धारित करते. कच्चा पालक खाणे सामान्यत: सुरक्षित मानले जाते आणि त्यात व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे लोह शोषण्यास मदत करते. या सर्व कारणांमुळे आरोग्याबद्दल जागरूक लोक कोशिंबीर किंवा हिरव्या स्मूदीमध्ये कच्या पालकचा समावेश करतात. तथापि, कच्या पालकमध्ये ऑक्सलेटसब नावाचे घटक असतात, जे लोह आणि कॅल्शियम सारख्या खनिजांना चिकटतात.



यामुळे शरीर ही पोषकद्रव्ये योग्यरीत्या शोषू शकत नाही. पोषण तज्ज्ञांच्या मते, जर तुम्ही फक्त कच्च्या पालकला लोहाचा मुख्य स्रोत बनवत असाल तर लोहाच्या कमतरतेचा धोका असू शकतो. त्यामुळे कच्या पालकाचे अधूनमधून सेवन करणे ठीक आहे, पण दररोज मोठ्या प्रमाणात याचे सेवन करणे फायदेशीर मानले जात नाही. पालक शिजवण्यामुळे त्याच्या पौष्टिक प्रोफाईलमध्ये मोठा फरक पडतो, विशेषत: लोहाच्या बाबतीत. एक कप कच्या पालकमध्ये सुमारे ०.८ मिलिग्रॅम लोह असते, तर एक कप शिजवलेल्या पालकमध्ये सुमारे ६.४ मिलिग्रॅम लोह असते. हा फरक उद्भवतो. कारण पालकचे पाणी शिजवल्यावर कमी होते आणि पोषक दाट होतात.

हेच कारण आहे की लोहाच्या कमतरतेशी झगडत असलेल्या लोकांसाठी शिजवलेले पालक अधिक फायदेशीर मानले जाते. पालक शिजवण्याचा आणखी एक मोठा फायदा म्हणजे उष्णता ऑक्सलेट तोडण्यास मदत करते. जेव्हा ऑक्सलेटसब कमी होतात तेव्हा लोह आणि कॅल्शियमसारखे खनिजे शरीरात अधिक चांगल्या प्रकारे शोषली जातात. याचा अर्थ असा की शिजवलेले पालक केवळ जास्त लोह देत नाही तर शरीर त्या लोहाचा योग्य वापर करण्यास देखील सक्षम आहे.

◆◆◆

## चिल्लाई कलान पर्वाच्या अंतरंगात...

काश्मीरमध्ये चिल्लाई कलान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ४० दिवसांच्या कडाक्याच्या हिवाळ्याच्या काळाला रविवारी सुरुवात झाली. यावेळी गुलमर्ग आणि सोनमर्ग यांसारख्या पर्यटन स्थळांसह उंचावरील भागात बर्फवृष्टी झाली, तर श्रीनगरसह सखल भागात पावसाने हजेरी लावली. काश्मीरमधील हिवाळ्याचा सर्वात थंड टप्पा असलेला चिल्लाई कलान २१ डिसेंबरला सुरू होतो आणि ३१ जानेवारीला संपतो. या ४० दिवसांच्या काळात संपूर्ण खोरे तीव्र थंडीच्या विळख्यात असते. यादरम्यान बर्फवृष्टी आणि पावसाची दाट शक्यता असते, तर रात्रीचे तापमान अनेकदा गोठणबिंदूच्या खाली असते.

चिल्लाई कलानमध्ये रात्रीच्या वेळी नळ आणि पाण्याचे साठे गोठतात, ज्यामुळे लोकांना नळांमधील पाणी वितळवण्यासाठी पाईप्स गरम करावे लागतात. १९८५ मध्ये श्रीनगरचे प्रसिद्ध दाल सरोवर पूर्णपणे गोठले होते आणि एका जीपने या गोठलेल्या थरावरून एक टोक ते दुसरे टोक गाठले होते. १९८६ मध्येही हे सरोवर पुन्हा



गोठले होते, तेव्हा लोकांनी त्यावर आईस हॉकी आणि क्रिकेट खेळण्याचा आनंद लुटला होता.

या काळात काश्मिरी लोक न्याहारीसाठी हरिसा नावाच्या गरम मांसयुक्त पदार्थांचा आस्वाद घेतात. चिल्लाई कलाननंतर २० दिवसांचा चिल्लाई-खुर्द (लहान थंडी) आणि १० दिवसांचा चिल्लाई-बच्चा (बाळ थंडी) हा काळ येतो. उत्तर काश्मीरमधील गुलमर्ग, मध्य काश्मीरमधील सोनमर्ग, दूधपथरी आणि इतर उंचावरील भाग जसे की राजदान पास, साधना टॉप आणि पीर की गली येथे बर्फवृष्टी झाली आहे. श्रीनगरसह मैदानी भागात पाऊस पडला. या हिवाळ्यात आतापर्यंत खोऱ्यात मोठी बर्फवृष्टी झालेली नाही. मात्र, हवामान खात्याने चिल्लाई कलानच्या सुरुवातीलाच पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

◆◆◆

## भारतीय महिलेचा गोऱ्या साहेबाशी लढा

अनिवासी भारतीय संजू पाल या एंडोमेट्रिओसिस नावाच्या गंभीर आजाराने त्रस्त आहेत. त्यांची ही न्यायालयीन लढाई यूकेच्या इक्वॅलिटी ॲक्ट २०१० (समानता कायदा) अंतर्गत या आजाराशी संबंधित अपंगत्व भेदभाव आव्हानांपैकी पहिली मानली जात आहे. कामाच्या ठिकाणी महिलांना मिळणारी वागणूक आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील 'गळाकापू' संस्कृतीला आव्हान देणारा एका महिला व्यावसायिकाचा सहा वर्षांचा संघर्ष आता




लंडनच्या उच्च न्यायालयातील अपिल ट्रिब्युनलमध्ये पोहोचला आहे.

४१ वर्षीय संजू पाल यांनी दावा केला आहे की, त्यांचा आजार (एंडोमेट्रिओसिस) हा कायद्यानुसार अपंगत्वाच्या श्रेणीत येतो आणि त्या आधारावर त्यांच्याशी झालेला भेदभाव बेकायदेशीर आहे. सल्लागार क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या अप ऑर आऊट पद्धतीला त्यांनी आव्हान दिले आहे. या पद्धतीत, जर कर्मचारी पुढच्या पदावर बढतीसाठी तयार नसेल, तर त्याला कामावरून काढून टाकले जाते. संजू यांच्या मते, ही पद्धत यूकेच्या एम्प्लॉयमेंट राईटसब ॲक्ट १९९६ नुसार अन्यायकारक आहे.

संजू पाल या ॲक्सेंचर (यूके) लिमिटेड या प्रसिद्ध सल्लागार कंपनीत मॅनेजर म्हणून कार्यरत होत्या. २०१९ मध्ये त्यांना अपेक्षित कामगिरी न केल्याच्या कारणास्तव कामावरून काढण्यात आले होते. कारण, त्या सीनियर मॅनेजर पदासाठी तयार नसल्याचे कंपनीचे म्हणणे होते. २०२२ मध्ये एका ट्रिब्युनलने त्यांचा अनफेअर डिस्मिसल (अन्यायकारक हकालपट्टी) चा दावा मान्य केला होता आणि त्यांना ४,२७५ पौंडस्ची नुकसानभरपाई दिली होती. मात्र, त्यावेळी त्यांचा आजार अपंगत्व म्हणून मान्य करण्यात आला नव्हता. आता उच्च न्यायालयात याच मुद्द्यावर दाद मागण्यात आली आहे.

एंडोमेट्रिओसिस हा महिलांमधील एक दीर्घकालीन आजार आहे, ज्यामध्ये ओटीपोटात तीव्र वेदना होतात. यूकेमध्ये सुमारे १५ लाख महिला या आजाराने त्रस्त आहेत. संजू यांच्या मते, कामाच्या ठिकाणी या आजाराने ग्रस्त महिलांना मिळणाऱ्या वागणुकीसाठी त्यांचा खटला एक वळण ठरू शकते.

◆◆◆

## आढळले अतिप्राचीन सूर्यमंदिर

इजिप्तची राजधानी कैरो येथे पुरातत्त्व विभागाने एक अत्यंत विस्मयकारक आणि ऐतिहासिक शोध लावला आहे. संशोधकांना सुमारे ४५०० वर्षे जुने एक सूर्य मंदिर सापडले असून, हे मंदिर प्राचीन इजिप्तच्या पाचव्या साम्राज्यातील असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

इजिप्तच्या पुरावशेष आणि पर्यटन मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, हा शोध इटली आणि पोलंडच्या संयुक्त पुरातत्त्व पथकाने लावला आहे. हे पथक 'किंग न्युसेरे' यांच्या मंदिराचा अभ्यास करत होते. या अभ्यासादरम्यान संशोधकांना सध्याच्या मंदिराच्या खाली कच्च्या विटांपासून बनवलेली एक प्राचीन इमारत सापडली. ही इमारत प्रत्यक्षात एक 'सूर्य मंदिर' असल्याचे समोर आले आहे. तज्ज्ञांच्या मते, पाचव्या साम्राज्यातील (इसवी सन पूर्व २४६५ ते २३२३) सहाव्या राजाने स्वतःचे मंदिर बांधण्यासाठी या जुन्या सूर्य मंदिराचा काही भाग पाडून त्यावर बांधकाम केले होते.



या ऐतिहासिक उत्खननात अनेक महत्त्वपूर्ण वस्तू हाती लागल्या आहेत. मातीची भांडी आणि बिअर ग्लास : प्राचीन काळातील जीवनशैली आणि पूजेच्या पद्धती समजून घेण्यासाठी हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. राजघराण्यातील शिक्के : पाचव्या साम्राज्यातील राजांची नावे असलेले काही शिक्के अवशेषामध्ये सापडले आहेत. विटांचे बांधकाम : प्राचीन इजिप्शियन वास्तुकलेचा नमुना असलेल्या कच्च्या विटांच्या भिंती आणि स्तंभांचे अवशेष.

इतिहासासाठी हा शोध महत्त्वाचा का?

प्राचीन इजिप्तमध्ये एकूण सहा ते सात सूर्य मंदिरे असल्याचे मानले जाते. मात्र, आतापर्यंत त्यापैकी केवळ दोनच मंदिरे शोधण्यात शास्त्रज्ञांना यश आले होते. हे नवीन सापडलेले मंदिर त्यापैकीच एक असू शकते. हा शोध केवळ एका इमारतीचा नसून, तो प्राचीन इजिप्तची पूजा पद्धती, साम्राज्य रचना आणि हरवलेल्या मंदिरांच्या रहस्यावर प्रकाश टाकणारा आहे. यामुळे जगातील सर्वात प्राचीन संस्कृतींपैकी एक असलेल्या इजिप्शियन संस्कृतीचा इतिहास नव्याने समजून घेण्यास मदत होणार आहे.

◆◆◆

